# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**बुधवार दिनांक २३.०५.२०१८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

दिनांक २३ मे २०१८ रोजी (२२.०५.२०१८ रोजीची पुढे ढकललेली सभा-का.प.क्र.१४) मा.महापौर श्री.नंदकुमार राधाकिसन घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे सकाळी ११.३० वा वंदेमातरम् या गीताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त,श्री.निपुण विनायक, नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी व संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १. | स.स. श्री.विजय साईनाथ औताडे |
| २. | स.स. श्री.विकास रतनलाल जैन |
| ३. | स.स. श्री.बमणे पुनमचंद सोनाजी |
| ४. | स.स. श्री.जाधव बन्सी ग्यानू |
| ५. | स.स. श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| ६. | स.स. श्रीमती ज्योती जयेश अभंग |
| ७. | स.स. श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| ८. | स.स. श्रीमती रोजतकर पुष्पा उत्तमराव |
| ९. | स.स. श्री.सुरे सीताराम इसराम |
| १०. | स.स. श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| ११. | स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले |
| १२. | स.स. श्री.खान अय्युब म.हुसेन खान |
| १३. | स.स. श्री.सचिन सुर्यकांत खैरे |
| १४. | स.स. श्री.शेजवळ सुभाष सयाजी |
| १५. | स.स. श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| १६. | स.स. श्रीमती लोखंडे मनिषा विनोद |
| १७. | स.स. श्री.अफसर खॉन यासीन खॉ |
| १८. | स.स. श्री.कादरी जमीर अहेमद रहीम अहेमद |
| १९. | स.स. श्रीमती तसनीम बेगम अ.रऊफ |
| २०. | स.स. श्रीमती खान सायरा बानो अजमल |
| २१. | स.स. श्रीमती सय्यद सरवतबेगम आरेफ हुसैनी |
| २२. | स.स. श्री.सिद्दीकी नासेर तकीउद्दीन |
| २३. | स.स. श्रीमती शेख नरगीस सलिम |
| २४. | स.स. श्री.खान जहांगीर मुलानी |
| २५. | स.स. श्रीमती खरात सिमा गणपत |
| २६. | स.स. श्रीमती शोभा नारायणराव वळसे |
| २७. | स.स. श्री.चित्ते नितीन रमन |

| | |
|---|---|
| २८. | स.स. श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर |
| २९. | स.स. श्रीमती शबनम बेगम कलीम कुरेशी |
| ३०. | स.स. श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| ३१. | स.स. श्री.मलके गोकुलसिंग संपतसिंग |
| ३२. | स.स. श्रीमती सुरेखा बाळासाहेब सानप |
| ३३. | स.स. श्री.शिंदे राजु रामराव |
| ३४. | स.स. श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| ३५. | स.स. श्री.खान इरशाद इब्राहिम |
| ३६. | स.स. श्रीमती खतीजा कुरैशी छोटू कुरैशी |
| ३७. | स.स. श्री.ढगे गंगाधर नामदेव |
| ३८. | स.स. श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखॉ |
| ३९. | स.स. श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| ४०. | स.स. श्री.एडके विकास प्रकाश |
| ४१. | स.स. श्री.भादवे रामेश्वर बाबुराव |
| ४२. | स.स. श्री.बल्लाळ मनोज आसाराम |
| ४३. | स.स. श्रीमती मलेका बेगम हबीब कुरैशी |
| ४४. | स.स.श्री.जागीरदार मोहम्मद अय्युब गुलाम जिलानी |
| ४५. | स.स. श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख |
| ४६. | स.स. श्री.दांडगे शिवाजी भाऊसाहेब |
| ४७. | स.स. श्रीमती देसरडा राखी प्रशांत |
| ४८. | स.स. श्रीमती भालेराव आशा नरेश |
| ४९. | स.स. श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| ५०. | स.स. श्रीमती रेशमा अशफाक कुरेशी |
| ५१. | स.स. श्रीमती बोर्डे सरीता अरुण |
| ५२. | स.स. श्रीमती बनकर विजया संजय |
| ५३. | स.स. श्री.साळवी नितीन दशरथ |
| ५४. | स.स. श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे |
| ५५. | स.स. श्रीमती कुलकर्णी जयश्री सुरेंद्र |
| ५६. | स.स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| ५७. | स.स. श्री.मनगटे गजानन भानुदास |
| ५८. | स.स. श्रीमती देशमुख माधुरी मिलींद |
| ५९. | स.स. श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे |
| ६०. | स.स. श्री.जगताप भाऊसाहेब उत्तमराव |
| ६१. | स.स. श्रीमती नरोटे कमल रामचंद्र |
| ६२. | स.स. श्री.जगताप कमलाकर शामराव |
| ६३. | स.स. श्रीमती चव्हाण सुनिता रामराव |
| ६४. | स.स. श्री.भगवान (बापु) देविदास घडमोडे |

| | |
|---|---|
| ६५. | स.स. श्री.गांगवे मनोज बन्सीलाल |
| ६६. | स.स. श्रीमती ज्योती सुनिल नाडे |
| ६७. | स.स. श्रीमती मुंढे मनिषा बाळासाहेब |
| ६८. | स.स. श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड |
| ६९. | स.स. श्रीमती मिना रामदास गायके |
| ७०. | स.स. श्री.पवार आत्माराम माणिकराव |
| ७१. | स.स. श्रीमती मोरे ज्योती राजाराम |
| ७२. | स.स. श्रीमती चक्रनारायण सीमा काहानुलाल |
| ७३. | स.स. श्री.थोरात दिलीप गंगाधर |
| ७४. | स.स. श्रीमती अर्चना शैलेंद्र निळकंठ |
| ७५. | स.स. श्रीमती सुमित्रा गिरीजाराम हाळनोर |
| ७६. | स.स. श्रीमती निकाळजे लता मगन |
| ७७. | स.स. श्री.सोनवणे राहुल पंढरीनाथ |
| ७८. | स.स. श्री.सिद्धांत संजय शिरसाट |
| ७९. | स.स. श्री.अब्दुल मं.नाविद अब्दुल रशीद |
| ८०. | स.स. श्रीमती विमल जनार्धन कांबळे |
| ८१. | स.स. श्रीमती स्मिता दिगंबर घोगरे |
| ८२. | स.स. श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण |
| ८३. | स.स. श्री.अप्पासाहेब विनायक हिवाळे |
| ८४. | स.स. कु.जमादार सायली भागवत |

**नामनिर्देशित पालिका सदस्यांची नावे**

१. श्री.घोडके कचरु छगनराव
२. श्री.कांबळे चेतन जनार्धन

**चर्चा:-**

मा.महापौर :सर्व स.सदस्य, अधिकारी कर्मचारी पत्रकार यांचे या सभेच्या निमित्ताने स्वागत करतो.

श्री.राजगौरव वानखेडे :सभागृहात गणपुर्ती पुर्ण आहे की नाही? याची मा.सचिवांनी नोंद घ्यायची आहे. मुर्डेश्वर संस्थाचे बालयोगी श्री.काशिगिरी महाराज यांचे १६ तारखेला दु:खद निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी. दिनांक ११-१२ रोजी शहरामध्ये जो हिंसाचार झाला. त्याच्यामध्ये श्री.जगन्नाथ बन्सीले हे शहिद झाले. त्यांना सुध्दा सभागृहातर्फे श्रध्दांजली देण्यात यावी. श्री.शेख हारीस यांचे सुध्दा दु:खद निधन झाले. त्यांना सुध्दा श्रध्दांजली देण्यात यावी.

श्री.प्रमोद राठोड :महानगरपालिकेचे माजी वार्ड अधिकारी श्री.नाथा लक्ष्मण चव्हाण यांचे आजारपणामुळे दु:खद निधन झाले. त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली देण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :नगरसेविका श्रीमती बबिता चावरिया यांचे पती श्री.विजय चावरिया यांचे दु:खद निधन झाले आणि हिंसाचारामध्ये जे मृत्युमुखी पडले. त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली देण्यात यावी.

श्री.अफसर खॉन :या दुर्घटनेमध्ये दोघांचा जीव गेला आहे. दोघांना महानगरपालिकेकडुन मदत देण्यात यावी.

(जो ठराव मांडला त्यास श्री.भाऊसाहेब जगताप, श्री.अय्युब जहागीरदार, श्री.भगवान घडमोडे, श्री.रेणुकादास वैद्य यांनी अनुमोदन दिले.)

मा.महापौर :स.सदस्यांनी या ठिकाणी जो श्रध्दांजलीचा प्रस्ताव मांडला, मुर्डेश्वर येथील बालयोगी श्री.काशिगिरी महाराज यांच ह्रदयविकाराने निधन झाले तसेच ११ आणि १२ तारखेला शहरात दोन गटामध्ये दंगल झाली. त्यात स्व.जगन्नाथ बन्सीले आणि स्व.शेख हरिस या दोघांना आपले प्राण गमवावे लागले. तसेच महानगरपालिकेचे माजी वार्ड अधिकारी स्व.नाथा चव्हाण यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. त्याच प्रमाणे स.नगरसेविका श्रीमती बबिता चावरिया यांचे पती स्व.विजय चावरिया यांचे सुध्दा दु:खद निधन झाले. या सर्वांना सभागृहाच्या माध्यमातुन भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत असतांना स्व.बन्सीले आणि स्व.हरिस यांना काही मदत करता येऊ शकते का? त्याबाबत सुध्दा विचार करुन कायद्याच्या चौकटीत राहुन तसा प्रस्ताव सभागृहामध्ये सादर करावा. श्रध्दांजलीचा ठराव मांडला सर्व स.सदस्यांना विनंती की, दोन मिनिटे उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येते.

(यावेळी स्व.काशिगीरी महाराज, स्व.जगन्नाथ बन्सीले, स्व.शेख हारीस, स्व.विजय चावरीया, स्व.नाथा चव्हाण यांचे निधनामुळे श्रध्दांजली अर्पण केली.)

श्री.मनोज बल्लाळ :औरंगाबाद शहरातील प्राध्यापिका श्रीमती मनिषा वाघमारे यांनी माऊंट एव्हरेस्ट शिखर सर केले. त्यांचा सभागृहातर्फे अभिनंदनाचा ठराव ठेवण्यात येतो.

श्री.राजगौरव वानखेडे :शिव छत्रपती पुरस्कार मिळविलेले १६ विजेत्याला तसेच श्रीमती मनिषाताई वाघमारे यांनी माऊंट एव्हरेस्ट सर केले. त्यांचे अभिनंदन आणि ज्या वेळेस शहरातील १६ खेळाडुंना शिव छत्रपती पुरस्कार दिला त्यावेळेस आदेशित केले होते की, त्या सर्वांचे सत्कार सभागृहातर्फे करावा. परंतु त्यांचा सत्कार करण्यात आला नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :श्री.मनोज बल्लाळ यांनी जो अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवला. त्यास माझे अनुमोदन आहे. काही खेळाडुंना आर्थिक मदत देऊ म्हणुन प्रस्ताव सभागृहात मंजुर केला. दुर्दैवाने त्यांना महापालिकेकडून आर्थिक मदत झाली नाही. श्रीमती रिध्दी प्रविण हत्तेकर नावाची एक जिम्नॅस्टर आंतरराष्ट्रीय स्थरावर खेळत आहे. त्यांना रु.१ लाख मदत करण्याचा प्रस्ताव मंजुर केला होता. त्याचे काय झाले? वेट लिफ्टींग असोशिएशन राष्ट्रीय स्थरावरच्या स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी परवानगी दिली. त्यांना ही आर्थिक मदत देण्याच्या दृष्टिकोनातुन प्रस्ताव मंजुर केला होता. तीन महिने झाले अद्याप पर्यंत कुठलीही कार्यवाही झालेली नाही.

श्री.प्रमोद राठोड :अभिनंदनाच्या ठरावास माझे अनुमोदन आहे आणि मा.आयुक्त यांनी Twitter अकाऊंट सुरु केले आहे. महानगरपालिकेचे कामकाज बघण्यासाठी असे त्यांनी नवीन नवीन उपक्रम सुरु करावे. त्यासाठी त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

श्रीमती किर्ती शिंदे :शिव छत्रपती पुरस्कार विजेते औरंगाबाद शहरातील प्राध्यापिका श्रीमती मनिषा वाघमारे यांनी गिर्यारोहणमध्ये तिरंगा झेंडा फडकावला त्यामुळे त्यांचा

सभागृहातर्फे अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात यावा आणि मा.आयुक्तांनी Twitter अकाऊंट सुरु केल्याबद्दल त्याचे सुध्दा अभिनंदन करण्यात यावे.

मा.महापौर :मा.आयुक्तांचे आठ दिवसाच्या कामगिरी बद्दल जो अभिनंदनाचा ठराव मांडण्यात आला तो मंजुर करण्यात येतो. सर्व स.सदस्यांनी या ठिकाणी एक खेद व्यक्त केले आहे. क्रिडा क्षेत्रामध्ये ज्यांनी ज्यांनी चांगली कामगिरी केली त्यांना पुरस्कार मिळाले अशा खेळाडुंचा सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा ठराव सर्वसाधारण सभेने घेतला होता आणि तसे आदेशित सुध्दा केले होते परंतु प्रशासकीय कामात दिरंगाई दिसुन आली आहे. तात्काळ जुनच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये त्यांना मदतीचा धनादेश देण्याबाबत तयारी करायची आहे. त्यांचा सत्कार दिनांक १५ जुनच्या आधी सभागृहात नियोजन करायचे आहे. त्यानुसार कार्यवाही करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :याबाबत मदत करण्यासाठी फोन केला तर लेखा विभागाचा फोन बंद असतो. त्यांना संपर्क कसा करायचा? अकाऊंट विभागाची कार्यपध्दत बदलण्याची गरज आहे.

मा.महापौर :शिव छत्रपती पुरस्कार विजेते, प्राध्यापिका श्रीमती मनिषाताई वाघमारे यांनी माऊंट एव्हरेस्ट सर केल्याबद्दल त्याचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे. त्यांचा सुध्दा सत्कार सभागृहामध्ये इतर खेळाडुंसोबत सत्कार समारंभाच्या दिवशी बोलावुन घ्यायचे आहे. श्री.राजु वैद्य यांनी जी खंत व्यक्त केली की, चिफ अकाऊंट ऑफिसर श्री.साळुंके यांचा फोन बंद असतो. त्यांना सक्त ताकिद देण्यात येते की, दुरध्वनीच्या माध्यमातुन भविष्यामध्ये अशी तक्रार येता कामा नये. श्री.रविंद्र निकम आपण याबाबत सर्व अधिकाऱ्यांना सुचना द्याव्यात. मुख्य लेखाधिकारी आपण फोन चालु ठेवण्याची दखल घ्यायची आहे.

श्री.भगवान घडमोडे :मा.आयुक्त कचरा प्रश्नावर लक्ष देत आहेत. पदाधिकारी मिळुन कचऱ्याचा प्रश्न चांगल्या प्रकारे मार्गी लावल्याबद्दल तुमचे आणि मा.आयुक्तांचे अभिनंदन करतो आणि मा.आयुक्तांचा जो स्वच्छ भारत मिशनचा अनुभव आहे. तो शहराला उपयोगी पडेल. आपण सर्वांनी मिळुन त्यांना प्रत्येक कामामध्ये सहकार्य करावे. त्यांचा अभिनंदनाचा ठराव सभागृहात ठेवतो.

श्री.रेणुकादास वैद्य :जो अभिनंदनाचा ठराव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :स.सदस्यांनी मांडलेल्या मा.आयुक्तांच्या कामाबद्दल अभिनंदनाच्या ठरावास मंजुरी देण्यात येते.

श्री.गंगाधर ढगे :अकाऊंट विभागात श्री.साळुंके आणि श्री.मेहेर हे वेळेवर नसतात. त्यांचा फोन बंद असतो. अकाऊंट विभागावर लक्ष केंद्रीत करुन या अधिकाऱ्यांना वेळेवर येण्याची सक्ती करावी.

मा.महापौर :मा.आयुक्त आपण या अकाऊंट विभागाची माहिती घेऊन बैठक घेण्यात यावी. विभागाचा पुर्ण आढावा घेण्यात यावा. योग्य त्या सुचना देण्यात याव्यात.

श्री.अफसर खॉन :शहरात तीन दिवसाआड पाणी देण्यासाठी कार्यवाही सुरु केली. श्री.चहल यांनी ठराविक भागात पाण्याचा आणखी एक दिवस वाढुन दिले आहे. दिवस वाढुन सुध्दा टाकीची लेवल आली नाही. हे असक्षम अधिकारी आहेत. यांना पाण्याचे

नियोजन करता येत नाही. हा पदभार दुसऱ्या कोणाकडे तरी देण्यात यावा. काही भागामध्ये पाच दिवसाआड पाणी येत आहे. १३५ एमएलडी पाणी शहरात दररोज येते. तीन दिवसाआड केले तरी ४०५ एमएलडी पाणी होते. शहराला २२० एमएलडी पाण्याची आवश्यकता आहे. बाकीचे पाणी कुठे जाते.

श्रीमती किर्ती शिंदे :सिडको बस स्टँड जवळील एपीआय कॉर्नर या उड्डाणपुलास श्री.वीर सावरकरांचे नाव देण्याचे ठरले होते. येणाऱ्या २८ तारखेला वीर सावरकर यांची जयंती आहे. तेव्हा प्रशासनाने नाव देण्यासाठी काही नियोजन केले आहे का?

मा.महापौर :दिनांक २७ रोजी त्या पुलाचे नामकरण सोहळा आहे. निश्चित झालेल्या पत्रिका छापण्याचे काम चालु आहे.

श्री.नितीन साळवी :मा.आयुक्तांनी जसे कचऱ्याचे नियोजन केले आहे. तसेच पाण्याचे सुध्दा नियोजन करण्यात यावे.

श्री.सिताराम सुरे :शहरामध्ये दररोज १५० एमएलडी पाणी येते. सन-२०११ साली शहरात दोन दिवसाआड पाणी केले होते. सन-२०१४ साली सुध्दा एवढेच पाणी येत होते आणि सन-२०१८ मध्ये तर काही ठिकाणी तीन तर काही ठिकाणी चार दिवसाआड पाणी केले आहे. शहराची पाण्याची रिक्वायरमेंट २२० एमएलडी असुन शहरात ४०५ एमएलडी पाणी आणतो. जर ४०५ एमएलडी पाणी तीन दिवसात आणु शकतो तर शहराला पाणी का पुरवू शकत नाही? प्रशासनाला याचे नियोजन करता येत नाही. मा.आमदार श्री.अतुलजी सावे यांनी पाणी प्रश्ना विषयी प्रशासनावर खंत व्यक्त केलेली आहे. आधी जसे दोन दिवसाआड पाणी देण्यात येत होते. तसेच आजच्या परिस्थितीमध्ये सुध्दा देण्यात यावे.

श्री.त्र्यंबक तुपे :कचऱ्याच्या अतिशय महत्वाच्या विषयावर मागच्या तीन महिन्यापासुन आपण वार्डा-वार्डामध्ये भेटी देत आहोत आणि जे पण शहर साफ, स्वच्छ करण्यासाठी करावे लागेल ते करत आहोत. आधी दोन दिवसाआड पाणी शहरामध्ये देत होतो. आता चार दिवसाआड आहे. प्रशासनाने सांगितले होते की, एक दिवस वाढवले तर शहरामध्ये कुठल्याही तक्रार येऊ देणार नाही आणि सर्व नागरीकांना पाणी पुरवठा व्यवस्थीत देण्यात येईल. अद्याप पर्यंत प्रशासनाच्या वतीने कुठलेही नियोजन झालेले नाहीत. गुंठेवारी, स्लम भागात ज्या ठिकाणी लोक साध्या झोपडींमध्ये, पत्र्यांच्या घरांमध्ये राहतात. त्या ठिकाणी जर सहा दिवसाआड पाणी देणार असेल तर त्या लोकांनी राहायचे कसे? चार-चार दिवस पाण्याचा स्टॉक करायचा कसा? विचारणा केल्यावर सांगितले जाते की, पंप बंद झाला आहे. पंप बंद होत असेल तर आपल्याकडे पॅरलल यंत्रणे नसावीत का? जर MSEB च्या माध्यमातुन त्याच्यासाठी वेगळी यंत्रणा फिडर वेगळे असावेत. MSEB च्या जायकवाडीत एक लाईट वेगळी असावी. तशी काही यंत्रणा केली नाही का? टँकर खाजगी ज्या संस्था आहेत तिकडे जातात, बिल्डरांकडे जातात. जो पर्यंत पाणी पुरवठा सुरळित होत नाही तो पर्यंत खाजगी संस्थेला, बिल्डर्सला टँकर देण्यात येऊ नये. सातारा देवळाई भागामध्ये टँकर सुरु करण्यात यावे.

श्रीमती मनिषा मुंढे :माझ्या वार्डात पाच दिवसाआड पाणी येत आहे. वार्डात खुप नळे लिकेज आहेत. सहा महिन्यापासुन पाण्याची फाईल पुटप करत नाहीत. वार्डात पाण्याची पाईप लाईन टाकुन देण्यात यावी.

श्रीमती रेशमा कुरैशी :कोटला कॉलनीमध्ये नळाचे २५ लिकेजेस आहेत. अधिकाऱ्यांना फोन केला तर याबाबत ते काहीच दखल घेत नाहीत. पाण्याचा प्रॉब्लेम वरुन चालु आहे असे उडवा-उडवीचे उत्तरे देत असतात. त्या लिकेजमधुन हजारो लिटर पाणी वाया जात आहे. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

श्रीमती शोभा वळसे :दिपनगरमध्ये पाण्यासाठी बोलले तरी सुध्दा पाणी सुरळीत येत नाही. वार्डात दोन दिवसाआड पाणी देण्यात यावे.

श्रीमती स्वाती नागरे :हडको-सिडकोवासीयांना तीन दिवसाआड पाणी येत असते. पाण्याचा फोर्स खुप कमी आहे. नागरीक घरी हंडा मोर्चा घेऊन येतात.

श्रीमती ज्योती नाडे :माझ्या वार्डात आतापर्यंत पाण्याचे नियोजन नाही. वार्डात पाचव्या-सहाव्या दिवशी पाणी येत आहे. राहुलनगरमध्ये रात्री एक वाजता पाणी येत आहे. पाणी दोन दिवसाआड देण्यात यावे.

श्रीमती शेख नरगीस :माझ्या वार्डात तीन दिवसाआड पाणी येत नाही. सहाव्या-सातव्या दिवशी पाणी येत आहे. श्री.चहल यांच्याकडुन हा चार्ज काढुन घेण्यात यावा. ते नियोजन करीत नाही.

श्रीमती ज्योती पिंजरकर:मागच्या बैठकीत आदेशीत केले होते की, दोन दिवसाआड पाणी देण्यात यावे. अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

श्री.शिवाजी दांडगे :मागच्या बैठकीत सांगुन सुध्दा अधिकाऱ्यांनी दोन दिवसाचे पाणी तीन दिवसावर आणले आहे. सिडको-हडकोच्या टाकीवर नागरीकांनी आक्रोश केला आहे. पाण्याचे आधी प्रमाणे सुरळीत नियोजन करण्यात यावे. एन-५ टाकीवरच अडचण का येते?

श्री.रेणुकादास वैद्य :पाणी पुरवठ्याच्या बाबतीत पाणी प्रश्न हा पुर्ण शहराचा प्रश्न आहे. तीन-तीन चार-चार दिवसाआड पाणी पुरवठा देत असतांना नागरीकांकडुन पुर्ण वर्षाचा टॅक्स का घेतला जातो? मागच्या वर्षी दुष्काळ असुन सुध्दा पाण्याची इतकी वाईट अवस्था झाली नव्हती. विद्युत पुरवठा खंडीत आहे. कारणे सांगतात. वार्डात विजयनगर, इतर कॉलनीमध्ये पाण्याची लाईन नाही. त्याची निविदा प्रक्रिया झाली आहे पण निविदा कोणी भरायला तयार नाही? हा विभाग सक्षम करण्यात यावा. दोन दिवसाआड पाणी पुरवठा शहरामध्ये करण्यात यावा. पाणी पुरवठ्याची कामे ६७-३ सी मध्ये करावी. या विभागाची आणखी २-३ जेई द्यावे.

श्री.भाऊसाहेब जगताप :माझ्या वार्डात अंबिकानगरमध्ये रात्री दीड वाजेपर्यंत पाणी येते. रामनगर, विठ्ठलनगर भागामध्ये सुध्दा रात्री एक वाजेपर्यंत सप्लाय करतात. कारण सांगितले जाते की, फारोळ्यावरुन दुपारी चार पंप बंद केले जाते. दिड दोन तास पंप बंद राहिले होते. पाणी पुरवठ्यामध्ये तात्काळ लक्ष घालुन जे संबंधीत अधिकारी आहेत त्यांना आदेशित करण्यात यावे की, शहरातील पाणी पुरवठा जो विस्कळित झालेला आहे त्यावर तात्काळ उपाय करण्यात यावा.

श्रीमती संगिता वाघुले :जे नियोजन सातारा-देवळाई भागात करत आहोत. त्याच पध्दतीचे नियोजन आरतीनगर, मिसरवाडी भागामध्ये पाण्याची पाईप लाईन नाही, लोक पाण्यापासुन वंचित आहे या भागांमध्ये सुध्दा पाणी लाईन करण्यात यावे.

श्रीमती माधुरी देशमुख :वार्डामध्ये स्वच्छता मोहिम आम्हीच राबवायची, कचरा झाडणाऱ्यांच्या मागे फिरायचे, वाल सोडायला टाकीवर जायचे, मग अधिकाऱ्यांचे काम काय? एन-५ च्या टाकीवर केव्हा ही गेलो तर हे सांगतात की, मागुन येणारे पाणी बंद आहे. टँकरचा कुठेच ताळमेळ लागत नाही. टँकर घोटाळ्याच्या बाबतीत जी माहिती आली होती. त्यामध्ये काही नंबर आले होते ते काही स्कूटरचे, बाईकचे आणि काही रिक्षाचे नंबर होते. यात टँकरचा एकही नंबर नव्हता. याची चौकशी झाली पाहिजे. खाजगी जलतरणाचे पाणी बंद करावे.

श्रीमती सुरेखा सानप :वार्डामध्ये आज फक्त दहा मिनिटेच पाणी आले. श्री.पदमे यांना विचारले तर त्यांनी सांगितले की, टाकीला लेवल नाही. संध्याकाळी सोडण्यात येईल. प्रत्येक वेळेस असेच काहीतरी उत्तर दिले जाते. वार्डामध्ये माजी नगरसेवक श्री.रगडे यांच्या गल्लीमध्ये खुप दुषित पाणी येत आहे. कारण जुनी पाईप लाईन आणि ड्रेनेज लाईन अगदी जोडुन आहे. ड्रेनेज लाईन भरल्यावर पुर्ण दुषित पाणी नळांमध्ये येत आहे. पाईप लाईन बदलुन देण्यात यावी. फुलेनगर भागात सुध्दा दुषित पाणी येत आहे. मा.न्यायालयाने आदेश देऊन सुध्दा उत्तरानगरी भागात पाईप लाईन का टाकुन देत नाहीत?

मा.महापौर :उत्तरानगरी भागात पाईप लाईन टाकण्यासाठी मा.न्यायालयाने कडक आदेश दिले आहेत. त्याचे काय झाले? ती फाईल माझ्याकडे आणुन द्यावी.

श्रीमती सीमा चक्रनारायण:माझ्या वार्डात पाचव्या ते सहाव्या दिवशी पाणी येत आहे. नागरीकांना पाणी साठा करता येत नाही.

श्रीमती सत्यभामा शिंदे :सिडकोच्या टाकीची लेवल उंच असल्यामुळे टाकी सगळ्यात शेवटी भरली जाते. त्या टाकीवरुन टॅकरद्वारे पुंडलिकनगर, हनुमाननगर भागात पाणी दिले जाते. सिडकोचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा. पाणी वेळेवर द्यावे.

श्रीमती अर्चना निळकंठ :वार्डामध्ये अपार्टमेंन्ट जास्त आहेत. त्यामुळे त्यांना पाणी पुरवठा व्यवस्थीत होत नाही. पाण्याचे प्रेशर खुप कमी असतो. दुषित पाणी येत आहे. दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात यावा.

श्रीमती मिना गायके :माझ्या वार्डातील सर्व भागात पाणी एकाच दिवशी करण्यात यावे.

श्री.कैलास गायकवाड :शहरामध्ये तीन दिवसाआड पाणी पुरवठा केल्यावर सुध्दा इंदिरानगर तसेच ५९, ६० या वार्डात जलवाहीनीतून दुषीत पाणी येते. लाईन जूनी झाली आहे. मोठे मोठे होल पडले. ड्रेनेजचे पाणी त्यात जाते. १८-१९ गल्ल्यांमध्ये दुषीत पाणी येते. बायजीपुरा भागामध्ये आजही आठ दिवसाला पाणी येत आहे.

श्री.गजानन मनगटे :पुंडलिकनगर जलकुंभाला पाणी देत असतांना गजानन महाराज मंदिर चौकामधील वॉल्व्ह वरुन पाणी दिले जाते. एन-५ च्या टाकीमध्ये जाणाऱ्या पाण्याला सहा थ्रेडवर जर बंद केलेले आहे तर नवीन वॉल्व्ह बसविण्याची काही गरज नव्हती. त्यांनी का बसवला? याचा प्रशासनाकडुन खुलासा घेण्यात यावा.

श्री.मनोज बल्लाळ :जुना मोंढा भागात तीनशे व्यासाची लाईन लिकेज आहे. मागिल सहा महिन्यापूर्वी शहर अभियंता यांनी स्वत: येऊन बघितले आहे. तिथुन हजारो लिटर पाणी वाया जात आहे.

श्री.बन्सी जाधव :माझा वार्ड बऱ्याच वर्षापासुन पाण्यापासून वंचित आहे. तिथे पाईप लाईन टाकल्या जात नाहीत. बऱ्याच वेळेस टेंडर काढले पण टेंडर कोणी घेत नाही. नागरीक घरी हंडा मोर्चा घेऊन येतात. लवकरात लवकर पाण्याची पाईप लाईन टाकण्यात यावी.

श्री.मोहन मेघावाले :प्रत्येक प्रभागामध्ये वार्ड अभियंता आहेत. त्यांच्याकडे पाण्याची जबाबदारी देण्यात यावी. वार्डात एसटीपी प्लॅन्टवर सकाळी पाच वाजेपासुन रात्रीच्या बारा वाजे पर्यंत पाण्याचे टँकर चालु असतात. यामध्ये लाईटचे बील किती येत असेल हे बघितले का? ज्या चार लोकांना परवानगी दिली असेल त्यांना पाणी देण्यासाठी माझा विरोध नाही. पण तिथे किती तरी टँकर रात्रंदिवस चालु असतात. श्रीमती कुलकर्णी मॅडम यांची तिथे ९ ते ५ वाजे पर्यंत ड्युटी आहे. जे तीन कर्मचारी अधिकारी असेल तिघांचा पगार, लाईटचे बिल आणि त्याचे पैसे किती येतात? रेट किती ठरवलेले आहेत? याचा पुर्ण खुलासा करण्यात यावा.

श्री.सिताराम सुरे :तीन वर्षापासुन एसटीपी प्लान्टवर त्या बोअरवर अनेक पाण्याचे टँकर भरले जात होते. तेव्हा नागरीकांना त्रास झाला नाही. जेव्हा माझ्या वार्डातली परिस्थिती नाजुक झाली. पाण्यासाठी नागरीक घरी मोर्चा घेऊन येऊ लागले. एन-१२ महानगरपालिकेच्या एसटीपी प्लॅन्टवर पाणी वापरण्यासाठी उपलब्ध आहे असे कळाल्यावर तिथे एक टँकर पाठवला. दिनांक २७ एप्रिलला स्थायी समितीमध्ये मा.सभापती यांच्यापुढे प्रस्ताव ठेवला. चर्चा झाली नंतर असा निर्णय झाला की, नाममात्र दराने महानगरपालिकेच्या टँकरला फिस लावू आणि टँकर, डिझेल, चालक माझा राहील. मी स्वत:च्या खर्चाने महानगरपालिकेचा फायदा करत आहे. एसटीपी प्लान्टचा बोअरचा किती लाईट बिल येते? आणि किती पैसे आहेत? ते ही सांगावे

(यावेळी स.सदस्य एकाच वेळी मोठ मोठ्याने बोलत होते.)

मा.महापौर :या प्रकरणामध्ये संपुर्ण चौकशी करुन संचिका तपासुन मा.आयुक्तांनी योग्य तो निर्णय घ्यावा. या प्रकरणामध्ये मा.आयुक्तांना संपुर्ण अधिकार देण्यात येत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :स.नगरसेवकांना महापौर दालनात बोलावुन विषय समजुन नंतर मा.आयुक्तां बरोबर चर्चा करुन योग्य तो निर्णय घ्यावा.

मा.महापौर :या प्रकरणामध्ये मा.आयुक्त, मी स्वत: आणि स.सदस्य यांनी उद्या सकाळी ११.०० वाजता माझ्या दालनामध्ये बैठक घेऊन योग्य तो निर्णय घेऊ.

श्री.त्र्यंबक तुपे :शहरामधील जेवढी मुख्य जलवाहिनी आहेत. त्यांच्यावरील जे अनाधिकृत कनेक्शन्स् आहे ते तात्काळ काढण्यासाठी सभागृहामध्ये निर्णय झाला होता. त्याचे काय झाले? टाकीची लेवल आणण्यासाठी प्रशासनाने काय केले पाहिजे? पाणी पुरवठा सुरळीत न झाल्यामुळे ज्या भागामध्ये कमी जास्त पाणी येत. तिथे टप्पे वाढवावे लागतात. दररोज १३५ एमएलडी पाणी येते. तीन दिवसाआड

पाणी देतो. तरी पुरवठा का होत नाही? पाण्याच्या टँकरवर जीपीएस सिस्टम बसवण्यात यावी.

श्री.पुनमचंद बमणे :हर्सुल विहीरीजवळ कचरा टाकण्यात येत आहे. तो कचरा विहीरीमध्ये पडत आहे. पाऊस पडल्यावर विहीरीचे पाणी दुषित होऊ शकते. जिवितहानी झाली तर त्याला जबाबदार कोण राहील?

श्री.रामेश्वर भादवे :शहरातले पाणी पाच दिवसाआड करुन सुध्दा सिडको-हडकोला पाणी मिळत नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :पाण्याचा प्रॅाब्लेम फक्त शहरातील अर्ध्या भागालाच का येतो? कारण पाणी प्रश्नावर फक्त नेमकेच नगरसेवक बोलत असतात. याचा अर्थ बाकीच्या नगरसेवकांना पाण्याचा प्रॅाब्लेम येत नाही. याचा पुर्ण अभ्यास करणे गरजेचे आहे. ठोस निर्णय घेऊन आठ दिवसामध्ये पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यात यावा. पुण्यामध्ये पाणीपट्टी रु.१,४००/- नाशिकमध्ये रु.१,५००/- असुन नागरीकांना दररोज पाणी, आपल्याकडे रु.४,४००/- असतांनी नागरीकांना पाचव्या-सहाव्या दिवशी पाणी देतो आहे. मागच्या वेळेस ठरवले होते की, १०% वार्षिक वाढ होती ती न करता रु.४,०५०/- पाणीपट्टी द्यायला पाहिजे पण प्रशासनाने त्याची दखल घेतलेली नाही. या वर्षी सुध्दा पाणीपट्टी वाढलेली आहे.

श्री.भगवान घडमोडे :मागच्या बैठकीत दोन दिवसाआड पाणी पुरवठा सुरळीत होईल असे आदेशित केले होते. परंतु त्यामध्ये कुठलीही प्रकारची सुधारणा झालेली नाही. एन-५ ला पाण्याच्या टाकीवर पडणारे पाणी रोज एक ते दिड तास पाणी का पडत नाही? अडचण काय आहे? याच्यावर बैठक घेऊन ते करायला पाहिजे होते पण ते काही झालेले दिसत नाही. काही ठिकाणी आठ-आठ तास पाणी चालु असते त्यावर तीनशे चारशे अनाधिकृत कनेक्शन्स् आहेत. पाण्याचा असमतोल असल्यामुळे नगरसेवकांमध्ये गैरसमज पसरतात. पाणी नको त्या वेळी सोडण्यात येत आहे. जे काही अनावश्यक काम चालु असतील ते थांबवण्यात यावे आणि ते बजेट पाण्याचे बिल देण्यासाठी वापरावे.

श्रीमती सायरा बानो :शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे. नियोजन होत नाही. येथील अधिकाऱ्याचे बदल्या करण्यात याव्यात. नागरीकांना पैसे देऊन टँकरचे पाणी घ्यावे लागते तेच पाणी नळाद्वारे का दिले जात नाही? मा.आयुक्त यासाठी काय नियोजन करणार आहे याचा खुलासा करण्यात यावा.

श्री.नितीन चित्ते :सिडको हडकोत व वार्डामध्ये पाच दिवसाआड पाणी येत आहे. कचऱ्याचा प्रश्न जसा मार्गी लावण्यात आला. तसाच पाण्याचा ही प्रश्न मार्गी लावण्यात यावा. शहराला मुबलक सेवा उपलब्ध करुन देत नाही. एन-५, एन-७ ची टाकीच का भरत नाही? दोन दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय घेतला कार्यवाही होत नाही. पाचव्या दिवशी पाणी देऊन, वार्डात दहा घरांना पाणी येत नाही. पाणी येते तेव्हाच लाईट जाते. कचरा प्रश्न सोडवत आहे तसाच पाण्याचा प्रश्न सोडवा.

श्रीमती स्मिता घोगरे :माझ्या वार्डात महिन्यापासुन पाण्याचे लिकेजेस आहे. श्री.चहल यांना लिकेजेस काढण्याकरिता टीम पाठवण्यासाठी वारंवार सुचना केल्या आहे पण कॉन्ट्रॅक्टर यांच्याशी संपर्क साधल्या नंतर ते बोलतात की, आमचे पेमेंट दिले गेलेले नाहीत

म्हणुन काम बंद आहे. शंभुनगर भागामध्ये टँकर मागवलेत तर श्री.चहल यांनी सांगितले की, निवडणुकीच्या वेळेस तर पैसेच वाटावे लागतात मग कशाला टँकर मागवता? या भाषेमध्ये बोलत होते.

श्री.प्रमोद राठोड :कोणत्या पाण्याच्या टाकीवरुन कुठल्या भागाला पाणी दिले गेले पाहिजे? किती व्यासाची पाईप लाईन टाकली गेली पाहिजे? हे सर्व प्रशासनाचे विषय आहे. यामध्ये कुठलाही नगरसेवक हे सांगु शकत नाही की, ह्याच पाण्याच्या टाकीवरुन ह्याच भागाला पाणी द्या, या पाण्याच्या टाकीमध्ये एवढीच पाण्याची पाईप लाईन टाका. आम्ही नगरसेवक जरी असलो तरी आम्ही कुठले तांत्रिक अधिकारी नाही. वर्कऑर्डर झाल्या नंतर सुध्दा कार्यकारी अभियंता ही कामे थांबवत असतांना उगाच नगरसेवकांना बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. आठ दिवसापुर्वी अतिरिक्त आयुक्तांच्या दालनामध्ये चर्चा झाली होती. तत्कालिन आयुक्त श्री.उदय चौधरी आले होते. त्यांनी स्पष्ट आदेश दिले होते की, वर्कऑर्डर झालेली कामे जाणुन बुजून थांबवलेली आहे ती सुरु करा. ते अद्याप पर्यंत थांबवलेली नाही. प्रशासन मुद्दामहून हे कामे करत नाहीत. असा स्पष्ट आरोप आहे. या प्रकरणामध्ये प्रामुख्याने लक्ष घालावे.

श्री.अप्पासाहेब हिवाळे :सातारा देवळाईसाठी मोफत टॅकर पाणी देणार होते त्याचे काय झाले?

श्री.अब्दुल नाईकवाडी :पाण्याचे नियोजन व्यवस्थीत करण्यात यावे. शहरामध्ये समान पाणी कसा करता येईल. याचा खुलासा मा.आयुक्तांनी करावे. एन-५ ची पाण्याची टाकी पडायला आली आहे. तरी सुध्दा तिथे पाणी भरले जाते. तिथे जीवीतहानी होऊ शकते. टँकर नागरिकांपर्यंत येत नाहीत कारण टँकर भरतात. एकीकडे आणि जाते दुसरीकडे याबाबत मी श्री.चहल यांना सुध्दा कळविलेले आहे. रजिस्टरमध्ये पासिंग नंबर नाही. फक्त नंबर टाकत आहे. विचारल्यावर सांगतात की, पासिंग नंबरची गरज नाही. नंबर घेण्यासाठी सांगिलेले नाही.

श्रीमती सायली जमादार:सातारा देवळाईसाठी मोफत पाण्याचे टँकर पुरविण्याचा ठराव मंजुर झाला होता. परंतु गेल्या दोन महिन्यापासुन एक सुध्दा टँकर सातारा देवळाई भागात आलेले नाही. पाण्यासाठी जो डीपीआर तयार करणार होतो त्याचे काय झाले?

मा.महापौर :डीपीआर ची एजन्सी मंजुर झाली काम सुरु आहे. २०-२५ दिवसामध्ये डीपीआर शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

श्री.राजु शिंदे :पाण्यावर प्रत्येक बैठकीत चर्चा करुन सुध्दा प्रशासनाकडुन कुठलीही कार्यवाही होतांना दिसत नाही. पूर्ण समांतर रद्द होऊ नये असे म्हटले होते. समांतर वाल्यानी जे जायकवाडी पासुन ते नक्षत्रवाडी पर्यंत पाण्याची पाईप लाईन ज्या दुसऱ्या टाटा कंपनीला दिली होती. किमान तेवढे ठेऊन रद्द करा. वसुली असेल ती रद्द करा, इनटर्नल असेल ती रद्द करा. परंतु त्यांनी सर्व समांतरच रद्द केली. सातारा देवळाई महानगरपालिकेमध्ये समाविष्ट करुन घेतल्यावर त्यांना पुर्ण सुविधा का देत नाहीत? तिथे पाणी नाही, ड्रेनेजची, लाईटची व्यवस्था नाही. शहरातले जुने लाईट काढुन तिथे फिट करण्यासाठी मा.महापौरांनी आदेश देऊन सहा महिने झाले अजुन सुध्दा काम झाले नाही. कुठलीही सुविधा देणार नसतील तर त्यांना शहरामध्ये का समावेश करुन घेतले? शहरामध्ये जे

चांगल्या अवस्थेतील लाईट काढुन तिथे लावणार आहे तसे न करता नवीन एक हजार एलईडी लावावे. जीमचा विषय सभागृहात आला होता. अतिरिक्त आयुक्तांनी जीमचा रु.५ कोटीचा विषय आयुक्ताच्या सहीने टेंडरला आली. सगळ्यात आधी प्राधान्य कशाला दिले पाहिजे? पाण्याला, लाईटला, कचऱ्याला की, जीमला दिला पाहिजे. परंतु अतिरिक्त आयुक्तांच्या सही शिवाय प्रस्ताव आणताच येत नाही कारण की, त्यांना सही करायची असेल तर आयुक्ताने लेखी स्वरुपात प्रधिकृत केले पाहिजे. त्या नंतर ते सही करु शकतात. प्राधान्य क्रमांक ठरवतांना मुलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करता कामा नये. मा.आयुक्तांनी त्या फाईलवर सही करावी आणि पाण्याचे टँकर सातारा देवळाई भागामध्ये चालु करावा. मागच्या बैठकीत सांगितले होते, सर्व टँकर वर बोर्ड लावावे ते खाजगी आहेत की, महानगरपालिकेचे आहेत. टँकर टाकीवरुन भरल्यावर कुठे जातात? काय करतात? कोणाचे ही त्यावर लक्ष राहात नाही. मागच्या बैठकीत रुलिंग दिली होती की, जे अवैध घरगुती नळ कनेक्शन्स् आहेत ते न काढता आधी कमर्शिअल नळ कनेक्शन्स् शोधावे. शहरामध्ये फक्त दोन हजार कमर्शिअल नळ कनेक्शन्स् आहेत. मा.महापौरांनी मागच्या बैठकीत रुलिंग दिले होते किमान दोन महिन्यामध्ये पन्नास हजार कमर्शिअल नळ कनेक्शन्स् शोधुन काढा आणि त्यावर कारवाई करा. पन्नास हजार नळ कनेक्शन्स् जर सापडले तर वार्षिक रु.५५ कोटी त्यातुन महानगरपालिकेला मिळतील. याकडे लक्ष दिले पाहिजे.

श्री.जहाँगीर खान :वार्डात अनाधिकृत नळ कनेक्शन्स् खुप झाले आहेत. रस्त्याने पाणी वाहत आहे. माझ्या वार्डात एक वर्षापासुन एलईडी लाईट बंद आहे. श्री.देशमुख यांना बोलवुन खुलासा करण्यात यावा.

श्री.कादरी जमीर :पाण्यासाठी अधिकाऱ्यांना फोन केला तर फोन बंद करुन ठेवतात. मागच्या सहा महिन्यापासुन सांगत आहेत की, एका गल्लीमध्ये ड्रेनेजचे पाणी सप्लाय होत आहे त्याचे टेंडर निघाले आहे काम सुरु होत नाही. पुर्ण शहरात समान पाणी वाटप करण्यात यावे.

श्रीमती ज्योती अभंग :तीन वर्षापासुन वार्डातील पाणी प्रश्नावर बोलत आहे. माझ्या वार्डात साफ-सफाई कर्मचारी राहतात. अद्याप पर्यंत तेथील कामाच्या संचिकेवर सही झालेली नाही.

मा.महापौर :वार्डातील ते इस्टीमेट संध्याकाळ पर्यंत मंजुर करावे.

श्रीमती विजया बनकर :वार्ड क्र.७३ मध्ये सौजन्यनगर भागात पाण्याची पाईप लाईन टाकण्यात यावी. तसेच वार्डात कमी दाबाने पाणी येते.

श्रीमती कमल नरोटे :वार्ड क्र.८३ मध्ये मुकूंदवाडी भागात सहाव्या दिवशी पाणी येत आहे. कमी दाबाने पाणी येत असुन सुध्दा पुर्ण दुषित पाणी येत आहे.

श्रीमती जयश्री कुलकर्णी:पाणी येण्याची वेळ निश्चित असावी.

श्रीमती सरीता बोर्डे :माझ्या वार्डात पाचव्या दिवशी आणि अर्ध्याच भागात पाणी येत आहे. ज्या भागात पाणी येत नाही. त्या भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. नागरीक पाणीपट्टी भरत असतात. नळ असून पाणी येत नाही.

श्री.सचिन खैरे :गुलमंडी, राजाबाजार या भागात सहाव्या दिवशी पाणी येत आहे. उपाय योजना केली जात नाही. दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्यात यावा.

श्रीमती लता निकाळजे :माझ्या वार्डामध्ये पाचव्या दिवशी आणि खुप कमी दाबाने पाणी येत आहे.

श्री.अय्युब जहागीरदार :तीन दिवसाआड पाणी देण्याचे आदेशित केले होते परंतु श्री.चहल यांनी नियोजन केले नाही. सहाव्या दिवशी पाणी येते. यांच्या जागेवर दुसरे सक्षम अधिकारी देण्यात यावे किंवा या विभागाचे दोन भागामध्ये विभाजन करावे. मोती कारंजामध्ये पाच नळ कनेक्शन्स् बंद करण्यात आले. मा.महापौरांनी रुलिंग दिली होती की, अभिनय टॉकिज जवळुन मेन लाईनवर अनाधिकृत कनेक्शन्स् शहागंज पर्यंत लावण्यात आले आहे. मग फक्त मोती कारंजाच का निवडण्यात आले नळ तोडण्यासाठी? या प्रकरणामध्ये श्री.सय्यद छोटु सय्यद अहमद या व्यक्तीने ११ लोकांवर ३४ कम्प्लेन्स केल्या. या पाच नळामध्ये एक नळ मस्जिदचा आहे. रमजानच्या महिन्यामध्ये लोक तिथे पाण्यासाठी तडजोड करीत आहेत.

श्री.राजगौरव वानखेडे :जे अनाधिकृत कनेक्शन्स् आहेत ते १००% तोडले गेले पाहिजे.

श्री.अय्युब जहागीरदार :श्रीमती साजेदा बेगम यांच्यावर त्या व्यक्तीने १४ कम्प्लेन्स केल्या आहे की, यांचे नळ अनाधिकृत आहे, घर अनाधिकृत आहे. सन-२०१९ पर्यंत त्या महिलेने पाणीपट्टी भरली आहे. तिच्या विरुध्द श्री.सय्यद छोटू नावाच्या व्यक्तीने १४ कम्प्लेन्स केल्या आहेत. पाच कम्प्लेन्स श्री.मिरजा रफीक यांच्या नावावर केल्या आहेत. तीन कम्प्लेन्स श्री.सय्यद अजहर यांच्यावर आहे. दोन कम्प्लेन्स श्री.सय्यद इफ्तेकार यांच्यावर केल्या आहेत. यांचे पण सन-२०१९ पर्यंत पाण्याचे टॅक्स पुर्ण भरले आहे. पुर्ण शहरामध्ये तीन दिवसाआड पाणी देण्यात यावे.

श्री.विकास जैन :जिथे पाईप लाईन आहे तरी पाणी येत नाही. इल्लिगल कनेक्शन्स् लिगलाईज कसे करता. येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. लीगल करण्यासाठी फक्त रु.५०० दंड ठेवला पाहिजे. अशा किती लाईन आहेत ज्या मेन टाकीवर २४ तास चालते? शासनाचे पत्र आले की, शहराचा सर्व्हे करा. सर्व्हे करत असतांना शहराच्या प्रॉपर्टी बरोबर नळ कनेक्शन्स्चा सुध्दा सर्व्हे करु शकतो.

मा.महापौर :दोन दिवसाचे नियोजन होते. प्रशासनाने ते नियोजन तीन दिवसाआड केले. सर्व नगरसेवकांनी ते मान्य सुध्दा केले पण परिस्थिती अशी आहे की, शहराला पाच-पाच दिवस पाणी मिळत नाही. जसे श्री.अफसर यांनी सांगितले की, १३५ एमएलडी पाणी येते शहराला दररोजची रिक्वायरमेंट २२० ची आहे. दोन दिवसाचे पाणी २७० एमएलडी होते तर एक दिवसाआड पाणी देऊन सुध्दा उरते. जायकवाडीचे, फारोळ्याचे पंप असतील, पंपामधील बिघाड असेल विज पुरवठा खंडीत होऊन पाणी पुरवठ्यावर परिणाम होतो हे कारण संयुक्तीक वाटत नाही. दुषित पाण्याच्या अनेक तक्रारी समोर आल्या आहे. वाटर कंटमनेशनचे सुध्दा प्रशासनाने गांभीर्याने घेतले नाही. काही टाक्या पडायला आल्या आहेत त्याच्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. पेमेंट देत नाहीत म्हणुन कॉन्ट्रॅक्टर काम घेत नाही याचा पाणी पुरवठ्यावर परिणाम झालेला आहे. पाण्याच्या जलवाहिण्या त्यांच्याकडे लक्ष दिले पाहिजे. टँकर किती जातात, कुठे

जातात, त्याला कलर कोड असावा, नंबरींग असावे, त्याचे सुध्दा ऑडीट झाले होते ते सभागृहासमोर आले नाही. सध्याच्या परिस्थितीत जे टँकर सुरु आहे ते कुठे द्यायचे, त्याची सिस्ट्रीम कशी चालु आहे सभागृहासमोर येणे गरजेचे आहे. त्याची टिप्पणी विषय पत्रिकेसोबत देण्याचे आदेशित केले होते ते का आले नाही? एसटीपी चे पाणी बाबत स.सदस्य श्री.सिताराम सुरे, श्री.मोहन मेघावाले, पदाधिकारी, आम्ही उद्या माझ्या दालनामध्ये बसुन दोघांमधील प्रश्न सोडवु. इल्लिगल नळ कट मोहीमच्या बाबतीत जसे श्री.आयुब जहागीरदार यांनी सांगितले की, फक्त मोती कारंजा का निवडला? परंतु सगळ्यांच्याच भावना आहे की, इनलिगल कनेक्शनस् काढण्याची मोहीम शहरामध्ये चालु असायला पाहिजे. एन-५ च्या वालचा, हर्सुलच्या विहीरीचा विषय त्या ठिकाणी दुषित पाणी होण्याची शक्यता आहे. पाणी पट्टीच्या बाबतीत रु.४,०५०/- घेत आहे रु.४,४००/- घेत नाही. श्री.चहल नगरसेवकांमध्ये गैरसमज पसरवू नये. भाजप च्या सिनियर सदस्यांनी त्या दिवशी आंदोलन केले त्या परिस्थितीमध्ये तुम्ही तीन दिवसाचा निर्णय घेतला होता ते काम सुध्दा पुर्ण केले नाही. सातारा देवळाई सप्लायमध्ये ज्या ठिकाणी टँकर देणे आवश्यक आहे तिथे सातारा देवळाईसहित करायला पाहिजे. मा.आयुक्त साहेब त्यांच्या निवेदनामध्ये घोषणा करतील. समांतर जलवाहिनीचा कोणत्या परिस्थितीत निर्णय घेतला? जायकवाडी ते नक्षत्रवाडी त्याच्या सहित तो प्रस्ताव ठेवला असता तर ही वेळ आली नसती. संपुर्ण समांतर जलवाहिनीचा प्रस्ताव ठेवत असतांना तत्कालिन प्रशासनाने सुध्दा तेव्हा तेवढा विषय वगळुन केला असता तर निश्चित पणे शहरामध्ये चांगल्या पध्दतीने पाणी आले असते. श्रीमती घोगरे ताईंना तुम्ही सांगितले की, निवडणुकीमध्ये पैसे वाटावे लागते असे बेताल वक्तव्य करत जाऊ नका. पाणी पुरवठा अत्यंत महत्वाचा विषय आहे. सगळ्या परिस्थितीमध्ये मा.आयुक्तांनी काही नियोजन केले आहे. प्रशासनाचे काय नियोजन आहे? ते सर्व स.सदस्यांसमोर मा.आयुक्तांना करण्यात येत आहे.

मा.आयुक्त :प्रशासनातर्फे सुरळीत पाणी पुरवठा शहरामध्ये झालेला नाही. त्यासाठी प्रशासकीय प्रमुख या जबाबदारीने माफी मागतो. माहिती घेण्याची सुरुवात केलेली आहे. २२० एमएलडी पाणी जर शहराला दररोज लागत असेल आणि १३५ एमएलडी पाणी दररोज उपलब्ध होत असेल तर शहराला तीन दिवसाआड पाणी का द्यावे लागते? टीम सोबत या विषयावर चर्चा सुरु केलेली आहे. पाणी एक दिवसाआड देण्यासाठी कालावधी कसा कमी करता येईल. सभागृहाची भावना लक्षात घेऊन असे प्रयत्न करणार आहोत. जायकवाडीत तीन हजार टीएमसी पाणी आहे. ५८ टीएमसी शहरासाठी आहे. शहरात २४ तास पाणी देता आले पाहिजे. समान पाणी बाबत काही ठिकाणी चार दिवसांनी काही ठिकाणी सहा दिवसांनी पाणी दिले जाते ही शहराच्या नियोजनाची मोठी चुकी वाटत आहे. पाण्याची गळती खुप ठिकाणी होत आहे पाणी वाया जात आहे, टँकरने पाणी जात आहे हे सर्व थांबवण्यासाठी काल टिम सोबत नियोजन केले आहे. सगळ्या झोनमध्ये काही दिवसांमध्ये कॅम्प आयोजित करुन या सदरील

कॅम्पचे नेत्रुत्व स.नगरसेवकांनी करावे. तिथे झोन निहाय अधिकारी उपस्थित राहुन सर्वांनाच या कॅम्पमध्ये उपस्थित राहाण्याचे निर्देश देत आहेत. सदरील कॅम्पमध्ये दोन-तीन प्रकारच्या कार्यवाही हाती घ्याव्यात. उगड्यावर जे पाणी वाया जात आहे ते टाळणे, ज्या ठिकाणी नळांना तोट्या नाहीत ते बसवुन घेणे, सार्वजनिक हितासाठी लोकांना सोबत घेऊन मोटर लावु देऊ नये. जी कामे आपल्याकडुन करता येईल ती कामे हाती घेऊन त्याचे नियोजन झाले पाहिजे. मेंन्टनन्स आणि रिपेअरसाठी प्रत्येक डेप्युटी इंजिनिअरने आपली कामे वर्षभरामध्ये कुठली करायची आहे त्याचे एकदाच नियोजन करुन बजेट ठेऊन हाती घेतली पाहिजे. जुने बिल दिले गेले नसतील त्यामुळे अडचण येत असेल तर त्या सिस्टमची पण शहानिशा करावे लागेल. जेणे करुन जे काम हाती घेतो आहेत त्याचे पेमेंटस् वेळेवर होतील. जवळपास दुप्पट इनलिगल कनेक्शनस् आहेत टाक्या भरल्या जात नाही, मुख्य लाईनवरुन कनेक्शनस् घेतले गेले आहेत, मोटर लावल्या गेल्या आहेत त्यामुळे पुर्ण सिस्टम फार प्रॉब्लेमेटिक झाले आहे. जसे समांतर योजना किंवा त्यावेळेस बऱ्यापैकी ऑडीट झालेला होता. त्यामध्ये १५०० कि.मी.डिस्ट्रीब्युशन लाईन टाकायची आहे, ६१ कि.मी. च्या मेन्स टाकायच्या आहेत, शहरामध्ये ३२ नवीन टाक्या कराव्या लागतील, ६१ पैकी १४ टाक्या बंद आहे. इतका मोठा इन्फ्रास्ट्रक्चर उभा केला तर जे पाणी जायकवाडीमध्ये उपलब्ध आहे त्याचे सगळीकडे चांगले नियोजन करता येईल. त्यासाठी तामिळनाडुचे काही सेवानिवृत्त चिफ इंजिनिअर्स् त्यांच्याशी चर्चा सुरु करत आहोत. पाण्याबाबत जे वार्ड चांगली कामगिरी दाखवेल त्या वार्डाला प्रशासनातर्फे झुकते माप देता येईल अशा प्रकारचे एक धोरण पुढे करावे लागणार आहे. कुठे कुठे पाणी लिकीजेस आहे त्याची यादी सगळ्यात अगोदर करुन कशामुळे ते होत आहे? वार्ड इंजिनिअरला सोबत घ्यावे. ते ड्रेनेज कुठून कुठे मिळत आहे ते समजेल. सातारा देवळाई बाबत स.सदस्यांनी ज्या सुचना मांडल्या त्याची नोद मी घेतली आहे. हर्सुलला कचरा टाकत होतो ती साईट अगदी विहीरीला लागुन आहे. श्री.सिकंदर आणि श्री.अफसर या गोष्टीची नोंद घ्यावी. चर्चा झाली होती की, त्या विहीरीच्या चारही बाजुला एक कंम्पाऊट वाल घ्यावी जेणे करुन विहीरीमध्ये पाणी जाणार नाही ते अजुन पर्यंत झालेले नाही त्याची नोंद घ्यावी ते ताबडतोब करावे. तेथील नागरीकांनी सांगितले होते की, इतर पर्यायी ठिकाण आहे पण तिथे अतिक्रमण आहे कि काय आहे जर असेल अशा काही ठिकाण जेथे धोका कमी आहे ते पण प्रशासनाला कळवावे आम्ही सहनियंत्रण समितीला तशा सुचना करु.

मा.महापौर :पब्लिक सप्लायमध्ये ज्या ठिकाणी आवश्यक असेल सातारा देवळाईसह त्या ठिकाणी एक महिन्या करिता टँकरने पाणी पुरवठा करायचा तो निर्णय घ्यावा लागेल. पब्लिक सप्लायमध्ये ज्या ठिकाणी देणे आवश्यक असेल त्या ठिकाणी महानगरपालिकेकडुन पाणी पुरवठ्याचे टँकर देण्यात येईल.

श्री.त्र्यंबक तुपे :ज्या ठिकाणी पाणी कमी दाबाने येत आहे त्या ठिकाणी मोटारी लावणे गरजेचे आहे. शहरामध्ये ४० ते ५० वार्ड गुंठेवारी आहे. ज्या ठिकाणी वार्डाचे उत्पन्न

असेल, टॅक्स असेल, हे प्रशासनाने वसुल करावे याबाबत कोणत्याच नगरसेवकाने विरोध केला नाही. ज्यांना टॅक्स लागलेला नाही त्या मालमत्तेला प्रशासनाने टॅक्स लावणे गरजेचे आहे. पाच मजली जरी इमारत असली तरी कोणत्याच स.सदस्यांनी टॅक्स लावण्यासाठी विरोध केलेला नाही. उलट याच सभेमध्ये स.सदस्यांनी आप आपल्या वार्डातले झालेले कॉम्पलेक्स, कमर्शिअल कॉम्पलेक्स, कुठे-कुठे टॅक्स नाही याचा पुर्ण लेखा-जोखा, पुर्ण याद्या प्रशासनाकडे दिलेल्या आहेत. या कामामध्ये प्रशासन कमी पडत आहे. प्रशासनाला आदेशित करावे की, जिथे मालमत्ता कर असेल तिथे त्यांना पुर्ण पणे टॅक्स लावा उत्पन्न मिळेल. महापालिका सक्षम कशी होईल हे सुध्दा बघितले पाहिजे.

मा.महापौर :सभा अर्धा तासासाठी तहकूब करण्यात येते. (वेळ दु.२.५० वा. पुन्हा ३.५० वाजता सभेला सुरूवात.)

श्री.त्र्यंबक तुपे :मागिल सभेत चर्चा झाल्यानुसार काही प्रकरणांचे चौकशी अहवाल येणार होते अहवाल आलेला आहे का?

मा.महापौर :कचरा विल्हेवाट प्रकरणाचा व महाराणा एजन्सीच्या संदर्भात अहवाल येणार होता. मा.आयुक्त आल्यानंतर ते अहवाल घेऊ.

श्रीमती माधुरी देशमुख:बजेट मध्ये पान क्रमांक १४० वर स्पील ओव्हरच्या यादीत प्रत्येक वार्डात संजयनगर असे टाकून कामे नमूद केली. वार्ड ८० माझा असून तेथे संजयनगर अस्तित्वात नसतांना नाव दिले.

श्री.मनोज गांगवे :वार्ड ८७ मध्ये संजयनगर असे नाव टाकून कामे नमूद केली. संजयनगर हा वार्ड ८३ आहे.

मा.महापौर :कोणत्या प्रभागातील संजयनगर आहे. त्याचा उल्लेख करून सदस्यांना कळविण्यात यावे. सदस्यांनी लेखी द्यावे. त्यानुसार दुरूस्ती संबंधीत अधिकारी यांनी करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :पावसाळा जवळ आलेला आहे. नाल्याची साफसफाई करावी, ड्रेनेज लाईन टाकल्या, माती नाल्यात आहे. आता पाऊस येण्याची शक्यता आहे. त्या माती व गाळामूळे पाणी परीसरात जाऊ शकते. या बाबत काय उपाय योजना केली?

श्रीमती मनीषा मुंढे :माझे वार्डात नाल्याचे भिंतीचे काम होत नाही. पाऊस पडला, तर परीस्थिती वाईट होईल नाल्यातील माती काढली नाही. भविष्यात जिवीतहानी होऊ शकते.

कार्य.अभिंयता :काम चालू केले आहे. पावसाचे पाणी थांबणार नाही. याची काळजी घेत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :वार्डात नवीन क्रॉक्रीट रस्ते सहा इंच झाले. रस्त्याची उंची वाढली. आता साईडची दुकाने रस्त्यापेक्षा खाली झाली. दुकानात पाणी जाऊ शकते. पावसाचे पाणी जाण्यासाठी ४० लक्षचे टेंडर झाले. ती संचिका मंजूर नाही.

कार्य.अभि.श्री.अली :एकूण ११ नाले आहेत. दोन नाल्याचे काम सुरू केले आहे.

मा.महापौर :उद्या ६.०० वाजता स.श्री.रेणुकादास वैद्य यांचे वार्डात व्हिजीट केली जाईल.

श्रीमती मिना गायके :माझे वार्डात गल्ली नंबर ८,९ मधील नाल्यावरील अतिक्रमण काढावे. तेथे घरे बांधली आहेत. नाल्याचा प्रवाह बंद केला. लोकांच्या घरामध्ये पाणी जाऊ शकते.

मा.महापौर :इमारत निरीक्षक यांनी ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री.प्रमोद राठोड :जयभवानीनगर भागात मा.पालकमंत्री यांनी भेट दिली होती. तेथील नाला सफाई बाबत वारंवार श्री.अफसर सिद्दीकी यांना पत्र दिले. मा.महापौर आपण सुध्दा पत्र दिले होते. जो पर्यंत अतिक्रमण हटविले जात नाही, तोपर्यंत काम करणार नाही असे ते सांगतात. तेथील दोन घरे काढली जात नाही. ती कुणाच्या तरी नातेवाईकाची आहे. यापुर्वी ज्यामूळे १०० लोकांच्या घरामध्ये पाणी गेले ती घरे तोडली नाही, उर्वरीत तोडले.

अति.अधि.श्री.अभंग :१०० टक्के घरे तोडण्यात आलेली आहेत.

श्री.भगवान घडमोडे :दोन घरे तोडली नाही. ज्यामूळे लोकांच्या घरामध्ये पाणी गेले होते.

श्री.प्रमोद राठोड :दोन वर्षापासून दोन घरे दाखवित आहे. ते का तोडत नाही? श्री.अफसर सिद्दीकी साहेबांचे दोन पत्र आहे तरी अतिक्रमण काढले जात नाही. कोठून काम सुरू करायचे अतिक्रमणाचे अधिकारी कसे ठरवितात? लोकांचे किती जीव घेणार आहे? १०० लोकांच्या घरात पाणी गेले आहे. अतिक्रमण विभागाचा निष्काळजी पणा आहे जाणूनबूजून हे करतात.

मा.आयुक्त :उपआयुक्त श्री.रविंद्र निकम यांनी उद्या सदर ठिकाणी जावे व सोबत तांत्रिक अधिकारी असतील, अतिक्रमणाचे अधिकारी असतील, या विषयावर उपाययोजना करावी. ३१ तारखेला मी स्वतः जागेवर येणार आहे. तत्पुर्वी जी काही आवश्यक कार्यवाही आहे ती करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :नाल्यामध्ये मुख्य सिव्हर लाईन टाकल्या. पाणी जाण्यास जागा नाही. माती गाळ असेल तो काढावा.

मा.महापौर :३१ तारखेला मा.आयुक्त तेथे पाहणी करणार आहे. नाल्याच्या प्रवाहामध्ये जे अडथळे असतील ते सोडविण्यासाठी संबंधीत अधिकारी यांना आयुक्त सुचना देत आहे. त्याची अंमलबजावणी करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :काही ठिकाणी छोटे नाले आहे. यंत्रसामुग्री खाली उतरायला पाहिजे असे अधिकारी यांचे म्हणणे आहे. अशी अडचण होणार आहे तर ते काम करणार की नाही?

श्रीमती संगिता वाघुले :आरतीनगर, मिसरवाडी भागात ड्रेनेज लाईनचे काम बरोबर नाही. लोकांच्या घरामध्ये पाणी गेले होते. चर्चा होते कार्यवाही होत नाही. लोकांनी एक आठवडा बाहेर स्वयंपाक केला.

मा.महापौर :उद्या श्री.कोल्हे यांनी त्या वार्डात जाऊन पाहणी करावी. कार्यवाही करावी.

श्री.रामेश्वर भादवे :माझे वार्डात नाले सफाई साठी जेसीबी येत नाही. पावसाळा जवळ येत आहे. लोकांच्या घरात पाणी जाऊ नये.

मा.महापौर :जेथे मशीनरी जात नाही, अशा भागात सहनियत्रंण अधिकारी यांनी मजूर लावून नाले साफ करावे.

श्रीमती चक्रनारायण सिमा:वार्डात मोरेश्वर सोसायटी हॉस्पीटलच्या मागे नाल्यावर अतिक्रमण झाले. या सोसायटीत व तिरूपती विहार मध्ये पाणी साठले होते. नाल्यावर अतिक्रमण झाले ते काढावे.

मा.महापौर :श्री.अभंग यांनी जाऊन पाहणी करावी. कार्यवाही करावी.

श्रीमती ज्योती नाडे :वार्डात विमानतळाच्या भिंतीलगत नाला तुडूंब भरलेला आहे. पावसाळा सुरू होणे अगोदर साफसफाई करावे. छोट्या नाल्यातील कचरा काढावा.

श्री.मनोज गांगवे :हा नाला माझ्या वार्डातून जाऊन पुढे मिळालेला आहे. शाहूनगर,रमाबाई आंबेडकरनगर भागात नाला बंद केला. एअरपोर्ट काम करू देत नाही.

कार्य.अभियंता श्री.अली :या विषयी एअरपोर्ट विभागाशी बोलणे झाले. ते परवानगी देणार त्यानंतर कार्यवाही होईल.

मा.महापौर :ताबडतोब कार्यवाही करावी.

श्रीमती नरगीस शेख :औरंगाबाद टाईम्स कॉलनी, कटकटगेट ते पोलीस मेसच्या नाल्याची साफसफाई करावी.

कु.सायली जमादार :सातारा-देवळाई भागात नाल्याच्या जागेवर अतिक्रमण करून मुरूम टाकून बंद करीत आहे. मार्कीग करून कार्यवाही करावी.

मा.महापौर :लेखी तक्रार द्यावी. टीपी विभागचे श्री.कुलकर्णी यांनी पाहणी करावी. कार्यवाही करावी.

श्रीमती सुमित्रा हाळनोर :जयनगर, दशमेशनगर भागातील नाल्याची साफसफाई करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :नाल्यातील मटेरियल काढून ते कूठे टाकणार आहे? तेही आदेशीत करावे. जेथे जागा असेल तेथे योग्य वाटेल अशा ठिकाणी टाकावे. ज्या वाहनातून गाळ व कचरा घेऊन जाणार त्याची परवानगी सुध्दा काढून द्यावी. परवानगी सहीत मान्यता द्यावी.

मा.महापौर :ज्या गाड्या मनपाच्या कामासाठी लावतो. त्यावर मनपाच्या सेवेत आहे असे बोर्ड असावेत. त्यासाठी प्रमाणपत्र तयार करून द्यावे.

श्री.राजू शिंदे :मनपाच्या हिताचे निर्णय घ्यावे. नाले सफाईच्या नावाखाली वाहने घेतो खर्च वाढतो आहे. त्यावर नियंत्रण असावे.कचरा तेथेच बाजूला टाकला जातो. पुन्हा तो कचरा नाल्यात येतो.

श्रीमती सायरा बानो :काचीवाडा, फाजलपूरा भागात चार नाले आहेत साफसफाई होत नाही. भुमिगत योजनेतून काम केले. नाल्यात माती टाकली. ती माती, गाळ काढावा. तो नाल्यातच बाजूला टाकू नये.

मा.महापौर :श्री.अफसर सिद्दीकी यांनी पाहणी करावी. कार्यवाही करावी.

श्री.त्र्यंबक तुपे :भुमिगत एजन्सीने नाल्यातून लाईन टाकली निघालेले माती तेथेच पडून आहे. ते उचलण्याचे काम त्या एजन्सीकडून करून घ्यावे. डीपीआर नुसार त्या एजन्सीने काम केले नाही.

श्री.राजू शिंदे :डीपीआर नुसार नाल्याच्या वरून जास्तीत जास्त लाईन टाकली पाहिजे. असे होते. त्या प्रमाणे काम करण्यास लेबर लागतील, अतिक्रमण काढावे लागणार यासाठी खर्च जास्त होता. म्हणून नाल्यातून मधोमध लाईन टाकली. मोठे चेंबर केले. आता पावसाळा लागल्यानंतर पाण्यातून कचरा वाहून येणार. कचरा अडकणार, बाजूच्या परीसरात पाणी जाणार. वाटेल तसे काम एजन्सीने केले. भुमिगत एजन्सीच्या बाबतीत चौकशी लावली होती. कार्यवाही केली नाही.

श्री.रावसाहेब आमले :पडेगावचा नाला साफ होत नाही. भुमिगत एजन्सीने काम केले. घाण तशीच पडून आहे.

मा.महापौर :भुमिगत योजनेतून कोणत्या नाल्यात लाईन टाकली. त्यांचेमूळे कुठे घाण पडलेली आहे. त्याचा अहवाल द्यावा.

कार्य.अभियंता-ड्रेनेज :मोठ्या नाल्यात लाईन सेन्टरमध्ये असेल, जेथे माती घाण पडलेली असेल, ती उचलून घेतली जाईल.

श्री.राजू शिंदे :या योजनेची पवई आयआयटी या संस्थेकडून चौकशी करायचे ठरले होते कार्यवाही केली नाही.

श्री.भगवान घडमोडे :माझे वार्डात रस्ता खोदून ठेवला. भुमिगत एजन्सीने काम केले नाही.

श्री.त्र्यंबक तुपे :विष्णूनगर ते झांबड इस्टेट नाल्यात ७०० व्यासाचे पाईप टाकले. खोदकाम केले आजही माती तशीच पडून आहे. सेन्टरला घेतल्यानंतर ब्रॅचेस लाईन जोडणेसाठी लेव्हल येत नाही. मॅच होत नाही. मुख्य सिव्हर होलचे अंतर जास्त आहे. डीडब्ल्युसीचे पाईप वरून टाकले. ते दबले आहे. आऊटलेट झाले. नाल्यातून पाणी वाहते. नाल्यात मोठी सिव्हर लाईन टाकली. आता गाळ काढणेस अडचण येणार आहे. जागा कमी राहिली आहे. हे काम करतांना प्लॅनींग नव्हते का? जेथे वसाहतीतील गल्लीचे लाईन येते त्यासमोर चेंबर यायला पाहिजे. एका पावसात पाईप उघडे पडणार आहे. एकही ब्रॅंच लाईन राहणार नाही. असे काम भुमिगत एजन्सीने केले.

श्री.राजू शिंदे :भुमिगत योजनेचा काय फायदा झाला?

कार्य.अभि.श्री.सिद्दीकी :३ मोठे एसटीपी केले. ५५ एमएलडी पाणी कांचनवाडी येथे स्ट्रीटमेंन्ट करतो. झाल्टा येथे ८ एमएलडी पाणी स्ट्रीटमेंन्ट करतो आहे. पडेगाव येथील एसटीपीला मुख्य लाईन टाकायची आहे. ६४ मी.लाईन टाकली आहे.

श्री.राजू शिंदे :५५ एमएलडी पाणी शुध्दीकरण होते. तर आता तेथे किती पाणी आहे. पाणी शुध्द करून विक्री करणार होतो काय झाले?

कार्य.अभियंता :५२ एमएलडी पाणी नाल्यात सोडले जाते.

श्री.राजू शिंदे :वार्डातल्या सर्व्हीस लाईन जोडल्या नाही तर एसटीपी मध्ये एवढे पाणी कोठून येत आहे? पैसे कमी पडले तर कर्ज काढतो आहे. अधिकारी गुत्तेदाराचे म्हणून काम करतात. ज्यांनी भुमीगतचे काम घेतले त्यांचीच पीएमसी आहे.

कार्य.अभियंता :जे पाणी ट्रीट होते त्याचा वापर चांगला व्हावा. यासाठी एक्स्प्रेशन ऑफ इन्स्ट्रेस मागीतले रू.५/- लिटर प्रमाणे कन्झ्युमरला देण्यास तयार आहे. पेपरला तसे जाहीर प्रगटन दिले. नेटवर टाकले. पाहणी करावी. युजेस करणेसाठी ऑफर येत नाही.

मा.महापौर :नाल्यातील मटेरीयल भुमिगत मूळे नाल्यात पडलेले असेल तर ते उचलून घ्यावे. रस्त्याची कामे त्यांचेकडून करून घ्यावी.

श्री.राजू शिंदे :पीएमसीचे पेमेन्ट थांबवावे म्हणून सांगितले होते. डीपीआर मध्ये चुका केल्या. एसटीपी सहा करणार होते केले चार रेल्वे पुलाखालून पाईपलाईन जाणार होती. र.रु.३ कोटी होते. र.रु.७ कोटी लागले असे होत असेल तर डीपीआरचा फायदा काय? पीएमसी चुका करणार. आपण पेमेन्ट देणार. हे योग्य नाही.

श्री.प्रमोद राठोड :भुमिगत योजने बाबत विशेष बैठक घ्यावी.

मा.महापौर :नाले सफाई वर चर्चा करावी. उद्याच मा.आयुक्तांकडे भुमिगत एजन्सीच्या संदर्भात बैठक लावावी.

श्री.विकास एडके :पावर पॉईन्ट प्रेझेंटेशन द्यावे. त्यानुसार माहिती द्यावी. विशेष सभा घ्यावी.

श्री.राजू शिंदे :ज्या ज्या योजना हाती घेतल्या. त्या पूर्ण झाले नाहीत.

मा.महापौर :किती नाले साफ केले? किती ठिकाणी नाल्यामध्ये भुमिगत मूळे माती गाळ पडलेला आहे? त्या बाबत कार्यवाही करावी.

श्री.रावसाहेब आमले :आमच्या भागात ४०० टन कचरा डम्पींग केला. प्रकिया केली नाही. पानकापड टाकले नाही. कॉंक्रीटींग केले नाही. आम्हाला नागरीकांनी घेराव घातला. पाहणी करावी नसता, जनता रस्त्यावर येईल त्यास मनपा जबाबदार राहिल. त्यावर फवारणी करावी

श्रीमती मनीषा लोखंडे :अगोदरच तेथे कत्तलखाना आहे. पुन्हा कचरा टाकणार. नागरीकांना त्रास होत आहे.

मा.महापौर :तेथील कचऱ्यावर प्रोसेसींग करावे. फवारणी करावी.

श्री.भगवान घडमोडे :कचरा हा तातडीचा विषय आहे. पावडर खरेदी झाली. कुठे वापरली? अहवाल आला नाही. पीट बांधले क्वॉलीटी चांगली नाही. अंदाजपत्रकात वाढ करून पीट बांधले. कचऱ्याची गंभीर समस्या असतांना प्रशासन यात काम बरोबर करीत नाही. या सर्व प्रकरणाची चौकशी व्हावी. पारदर्शकपणे सर्व गोष्टी समोर याव्यात. पीट किती बांधले? खर्च किती केला?

मा.महापौर :पावडर खरेदी बाबत कारणापुरता उतारा प्रशासनाकडे दिला आहे. अहवाल येईल कम्पोट पीट, शेड आणि शॉर्टींग शेडबाबत र.रु.५४५ कोटीचा खर्च झाला. त्याचा अहवाल आला आहे. शहर अभियंता अहवाल देतील.

श्री.भगवान घडमोडे :अवाजवी खर्च करणार असेल तर योग्य नाही. काटकसर केली नाही सभागृहाची दिशाभूल करून काम केले. दिनांक १०.०५.२०१६ रोजी जेटींग मशीन खरेदीचा ठराव झाला. आजपर्यंत मशीन खरेदी केले नाही. पाण्यासाठी पैसे नाही. ऐनवेळी र.रु.५ कोटीचे ठराव येतात. हे योग्य नाही. पीटनिहाय किती खर्च झाला? याची माहिती द्यावी.

श्री.राजू शिंदे :एवढ्या खर्चात र.रु.१०-१० लक्षच्या मशीन बसू शकलो असतो. कायम स्वरूपी तोडगा निघाला असता, ५० वार्डाचा प्रश्न सुटला असता. हा डीपीआर कोणी बनविला? प्रत्येक शहराची भौगोलिक परीस्थिती वेगळी असते, येथे इंदौर पॅटर्न वापरत आहोत का? ज्यांनी कुणी केले त्यांचेवर कार्यवाही करावी. डीपीआर मध्येही चुका झाल्या. डीपीआरनुसार काम का केले नाही? आणीबाणीच्या काळात जास्तीचा खर्च होत आहे. मा.आयुक्त आले. आता सिस्टम लागली, असे म्हणता, हे अगोदर पुर्वीच्या लोकांना का कळाले नाही? कचरा नावाखाली अधिकारी दुसरे काम करीत नाही. पीट बांधले गरज होती का? चांगले बांधले का? तपासणी करावी.

श्री.विकास जैन :कचरा डम्प होतो. प्रोसेसींग काय करणार आहे? ६७-३ सी मध्ये पीट केले मशीन का खरेदी केले नाही? लॉंगटर्म पीट चालू शकतात का? मशीनरी दिसत नाही म्हणून नागरीकांचा विरोध होत आहे. पावसाळा येईल मशीनरी तोपर्यंत

येतील का? ४००-५०० टन पेक्षा जास्त कचरा जमा होतो. डम्प करणे हा पर्याय नाही. प्रोसेसींग करावे. मशीन खरेदीचे टेंडर काढले. पुन्हा रि-कॉल केले. ६७-३ सी मध्ये का केले नाही?

श्री.भगवान घडमोडे :घाई गडबडीत अनेक निर्णय घेतले गेले. नारेगाव प्रकरणात मा.कोर्टाचे आदेश आहे. काम करावे लागेल असे सांगण्यात आले होते. त्यामूळे काही निर्णय करून घेतले. परंतु जी कामे झाली, त्याचा आऊटपुट काहीच नाही. पीट केले आता मशीनरी घेणार. ते कशा घ्यायचा? काय काम करणार आहे? घाईत काम करू नये. याचा अर्थ मनपाचा विनाकारण खर्च होतो आहे. र.रु.४ कोटी खर्च केले पीट केले. त्याची टेक्नीकल दृष्ट्या तपासणी करावी. अभ्यास करावा. मशीनरी खरेदी बाबत पुन्हा निविदा काढाव्यात. पुन्हा पुन्हा खर्च करायची गरज पडू नये. हे नियोजन करावे. पीटचे बांधकाम झाले. त्याची चौकशी करावी. क्वॉलीटी चांगली नाही.

मा.महापौर :पीटसाठी र.रू.५,४५,३९,४१३/- खर्च केले. एकूण किती खर्च झाला? किती वापर होतो? का किती पीट केले? क्वॉलीटी चांगली आहे की नाही? याची चौकशी करावी. पुढील बैठकीत अहवाल द्यावा. कचरा समस्या व आजची परिस्थिती व आठ दिवसांमध्ये केलेले काम याची स्थिती मा.आयुक्त माहिती देत आहे.

मा.आयुक्त :ज्या सुचना केल्या त्या मोलाच्या आहेत. आणीबाणीच्या वेळी काही निर्णय घ्यावे लागले. कचरा एका ठिकाणी राहू दिला जात नाही. पावसाळा येत आहे. चार ठिकाणी कचरा न्यावा. असा सहनियंत्रण समितीचा निर्णय झाला. सदस्यांनी मदत केली. आता कायम स्वरूपी निर्णय घेण्याचा विषय समोर आला. तसा प्रयत्न करतो आहे. अभ्यास करतो, कचरा सेन्ट्रलाईज प्रोसेस नुसार करायचा की, डी-सेन्ट्रलाईज प्रमाणे करायचा. डीपीआर मध्ये दिले आहे. कलेक्शन ट्रान्सपर कसे असावे? घराघरातून कचरा उचलून नेणे, बंद गाड्यातून कचरा नेला पाहिजे. तशा गाड्या या शहरात चांगली व्यवस्था असावी. अशी अपेक्षा आहे. अभ्यास केल्यानंतर एक कनेक्शन ट्रान्स्पोटेशन आणी प्रोसेसींग बाबत टेंडर काढून अशी यंत्रणा आणण्याचा प्रयत्न करू. त्यांचेवर संपूर्ण जबाबदारी टाकता येईल. जास्तीत जास्त डी-सेन्ट्रालाईजकडे वळवू या, परंतु जोपर्यंत डी-सेन्ट्रलाईज साठी शेड तयार होत नाही. तोपर्यंत प्रोफेशनल पध्दतीने महापालिकेने जमा करून त्यावर प्रोसेसींग करता आले पाहिजे. तसे तज्ञ मार्केट मध्ये उपलब्ध आहे. पारदर्शक पध्दतीने टेंडर करून पुढील कार्यवाही होईल.

मा.महापौर :ज्या चार जागा कचऱ्यासाठी निश्चित केल्या पडेगावचा विषय समोर आला तेथील कचरा येण्याचे बंद होऊ नये. कारण त्या जागा निश्चित केल्या. त्याची माहिती मा.कोर्टात व राज्य शासनाला गेली आहे. तो कचरा डम्पींग करतो प्रोसेसींग करणार आहे. मशीनरी टाकतो आहे.

श्रीमती सुरेखा सानप :नारेगाव स्मशानभुमीमध्ये लाईट बंद आहे. गाडीच्या लाईटची मदत घेऊन अंत्यविधी करण्यात आले.

मा.महापौर :कार्यवाही करावी.

उपअभि.श्री.देशमुख :आजच नारेगाव येथील पाहणी केली जाईल.

श्री.विकास जैन :प्रत्येक वार्डात लाईट बंद आहे. काम न करता ठेकेदार बील घेत आहे.

मा.आयुक्त :शहर अभियंता श्री.वसंत निकम व श्री.अंभग यांनी पडेगाव येथील कचऱ्यावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा.महापौर :तेथील कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावावी.

श्री.राजगौरव वानखेडे :सकाळी लावलेला लाईट सायंकाळी बंद होतो. १० लाईट लावतात. ७ बंद होतात. आपण काम न करता बील देतो. जे बंद झाले त्याचे बील देतो का? किती काम करतात? टेंडर कधी झाले? मुदतवाढ देऊ नये.

मा.महापौर :लाईट संदर्भात उद्या मा.आयुक्त वार्डनिहाय आढावा बैठक घेणार आहे.

श्री.राजू शिंदे :कांचनवाडी भागात लाईट बंद आहे. स.सदस्या यांनी पत्र दिले. लाईट लावले जात नाही. रात्री अपघात होत आहे. एमआयडीसी भागात जीआय पोल टाकून लाईट फिटींग टाकणे बाबत मी पत्र दिले. र.रु.२० लक्षची तरतूद होती. र.रु.१० लक्षचे अंदाजपत्रक झाले. जीआय पोल न लावता अप्टीनन्स पोल लावले या पोलची किंमत रु.१७ हजार आहे. जीआय पोल रु.३ हजार मध्ये येतो. खर्च वाढला आहे. हा बदल का केला?

श्री.रेणुकादास वैद्य :रु.३ हजार किंमतीचे पोल घेऊ शकतो. त्या ऐवजी रु.१७ हजाराचा पोल घेतो आहे. जास्त किमतीचे पोल घेण्याचे कुणी सजेस्ट केले होते? यामूळे मनपाचे नुकसान करीत आहे.

मा.महापौर :जीआय पोलच लावावे.

कार्य.अभि.श्री.कोल्हे :ती संचिका मागवून घेतो. योग्य ती कार्यवाही होईल.

श्री.राजू शिंदे :आता माझे वार्डात ३० पोल व १०० लाईट आले तर बाकीचे लाईट कुठे लावायचे? असा प्रश्न येतो. सर्वच वार्डात ही परीस्थिती आहे का? शहरात असे किती पोल बसविले? आता माझे वार्डसाठी ७० पोल द्यावे.

श्री.गजानन मनगटे :एलईडीचे कामाची कॉस्ट १० कोटीची होती. त्या एजन्सीला र.रु.१०० कोटीत काम दिले. यात मनपाचे नुकसान झाले.

श्री.वैद्य रेणुकादास :रु.१२० कोटीत एलईडीचा ठेका दिला. त्याला काम करणार पैसे दिले जाणार आहे. त्यांनी मेन्टेनन्सचे प्रमाणपत्र कोठून प्राप्त केले? माहित नाही. आपण ऑर्डर केली ते तपासावे. एलईडी लाईट बसवून मेन्टेनन्स त्यांनी करायचे होते. तरी सुध्दा महापालिका आता त्या लाईटवर खर्च करीत आहे. एकाच कामावर वेगवेगळ्या पध्दतीने डबल खर्च करीत आहे. हे थांबवावे.

श्री.राजू शिंदे :जे-जे लिकिजेस आहे. देखभाल दुरूस्तीच्या नावाखाली पैसे खर्च करणे चालू आहे. ते थांबविणे आवश्यक आहे.

श्री.नितीन चित्ते :एलईडी कपंनी सांगते की, एक्झीस्टींग लाईट आम्ही बदलणार नाही. जे की, १० वर्षापुर्वी जे लाईट लावलेले आहे ते कॉम्प्रेसिव्ह यांचेकडून मेंन्टेनन्स करून घ्यावे. असे त्याचे म्हणणे आहे. कॉम्प्रेसिव्ह एजन्सी काम करीत नाही. सर्व माहिती घ्यावी.

श्री.गजानन मनगटे :नवीन पोल व तेथे लाईट बसविण्या बाबत काय भुमिका आहे?

श्री.रेणुकादास वैद्य :एलईडी सोबत करारनामा केला. त्यात केबल टाकणे पॅनल बोर्ड बसविणे, एलईडी लाईट लावणे. त्याचे मेन्टेनन्स करणे इत्यादी कामे होती. ती कामे आता मनपा करीत आहे. एक पॉलीसी ठरवावी. डबल पैसे खर्च होत आहे.

श्री.गजानन मनगटे :एलईडीचे काम घेणारे एजन्सीने लाईटचे दर जास्त लावले आहे. तफावत आहे ती काढणे आवश्यक आहे. एलईडीचे रु.१० कोटीचे काम रु.१२० कोटीत दिले. लाईट लावत नाही. प्रकाश पडत नाही. वार्डात नवीन लाईट लावण्याची एकही संचिका मंजूर होत नाही. श्री.बनसोडे हे त्या एजन्सीमध्ये पार्टनर होते. मनपाचे त्यांनी नुकसान केले. माझे वार्डात १० वर्षापासून लाईटची कामे केली नाही. मी निवडून आलो त्या वार्डातील संचिकेवर रिमार्क मारतात. एलईडीचे टेंडर बोगस आहे, संपुर्ण काम बोगस आहे. थर्ड पार्टीचे इन्स्पेक्शन झाले. त्याचा अहवाल आला. एलईडी संदर्भात कार्यवाही न झाल्यास मी मा.न्यायालयात दाद मागेल.

मा.महापौर :लाईटचे जे सर्व विषय असतील. वार्ड निहाय आढावा घ्यावा.

श्री.कैलास गायकवाड :लाईटचे मेन्टेनन्सचे दोन अडीच वर्षापासून टेंडर काढले नाही. असलेल्या एजन्सीला मुदत वाढ दिली जाते. मुदतवाढीच्या वेळेपूर्वी दोन तीन आठवडे काम बंद करतात. ती संचिका १ महिना मंजूर होत नाही. परंतु एक महिना काम न करता बील दिले जाते. माझे वार्डात १२ वी योजनेमध्ये केबलची समस्या आहे. एलईडीने केबल टाकण्याची प्रोव्हीजन असतांना काळजी घेत नाही.

मा.महापौर :वार्ड निहाय मा.आयुक्तांकडे सर्व सदस्यांनी तक्रारी द्याव्यात. प्रश्न सुटेल.

श्रीमती सीमा चक्रनारायण:सुतगिरणी चौक ते काबरानगर ९ मीटरच्या रस्त्यावर लाईट बसविता येत नाही असे सांगतात. इतर वार्डत कसे बसविले.

मा.महापौर :या भागातही लाईट बसविण्यात यावे.

मा.आयुक्त :या विभागाचा एक आठवड्यात आढावा घेतो. नियोजन कसे करता येईल ते पाहतो. कुठे नवीन लाईटची गरज आहे. एक्झीस्टींग लाईट नादुरूस्त होत असेल तर दुरूस्त करणेची काय पॉलीसी आहे? योग्य तो निर्णय घेऊ.

श्री.राजू शिंदे :सातारा देवळाई भागात “ड” वर्ग मध्ये मालमत्तांना टॅक्स आकारणी करून पैसे घेतले. आता ‘अ’ ‘ब’ ‘क’ नुसार टॅक्स लावावा. असे कार्यवाही होत आहे. दोन भुमिका घेऊ नये. तीन वर्ष झाले सर्व माहिती घ्यावी. मुद्दामहून सतावतो का? नगर रचना अधिकारी जागेवर बसत नाही. ते येणार नाही तर परवानगी थांबविणार का? महसूल बुडीत होणार आहे. सुट्टीवर जातात, परवानगी घेतात का? “ड” प्रमाणेच कर लावावा. अबक हे २८ गावासाठी आहे सातारा देवळाई त्यातून वगळले आहे. शासनाकडून तसे पत्रव्यवहार करून योग्य ती कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

मा.महापौर :सहा.संचालक नगर रचना हे विनापरवानगी गैरहजर असतील तर कार्यवाही करावी. या विभागाचे अधिकार मा.आयुक्तांकडे राखीव आहे. ते योग्य ती कार्यवाही करतील. सातारा देवळाई येथील मालमत्ता कर कोणत्या वर्गवारीनुसार लावला. आढावा घेतला जाईल.

**विषय क्रमांक ४५९:-** **(शहर अभियंता)**

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४,दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणे.

**चर्चा:-**

श्री.राजगौरव वानखेडे :मागिल सभेत विषय क्रमांक-४५७ पर्यत विषय होते. विषय क्रमांक-४५८ वाटप केला नव्हता. आता विषय क्रमांक-४५९ कसा आलेला आहे?

श्री.प्रमोद राठोड :ऐनवेळी विषय क्रमांक-४५८ वाटप केला नव्हता, एवढी का घाई होती की? ऐनवेळी मंजूर करून घेतला. आता विषय क्रमांक-४५९ हा क्रमांक समोर आलेला आहे.

मा.महापौर :ऐनवेळी विषय वाटप करण्याचे सचिव यांना आदेशीत केले होते. काहींना प्रत मिळाली नसेल.

श्री.राजगौरव वानखेडे :विषय क्रमांक-४५८ हा विषय ऐनवेळी कसा घेतला? आम्हाला माहिती नाही सचिव यांची भुमिका संशयास्पद वाटत आहे.

श्री.भगवान घडमोडे :विषय क्रमांक-४५८ हा विषय वाटप केला नाही. एवढा तातडीचा विषय होता का?

श्री.रेणुकादास वैद्य :शौचायलयासाठी अनेकांनी अर्ज केले. पात्र आहे असे असतांना, शासनाकडून अनुदान प्राप्त नाही. त्यामुळे अडचणी येतात. शासनाकडून अनुदान आणणेसाठी अधिकारी नेमावे. जे पात्र लोक आहेत त्यांना शासन अनुदान येईपर्यंत मनपा फंडातून शौचालयासाठी निधी द्यावा.

श्रीमती संगीता वाघुले :काहींना पहिला हप्ता दिला. दुसरा हप्ता मिळाला नाही. काहीना दोन्ही हप्ते मिळाले नाही. शासनाकडून निधी येईल. या अपेक्षेने अनेकांनी शौचालय बांधले. मनपा फंडातून रक्कम द्यावी.

श्री.गोकुळसिंग मलके :शौचालय बांधले. तेथे भांडे बसविण्यात येत नाही. मनपा फंडातून काम करावे.

मा.महापौर :शौचालयाची अर्धवट कामे आहेत ती कामे पुर्ण मनपाच्या फंडातून करावीत. शासनाकडून अनुदान येईल तेंव्हा ते मनपाच्या फंडात वळती करावे.

कार्य.अभि.ड्रेनेज :सभागृहाच्या निर्णयानुसार लेखा विभागास तसे तरतुद करणे बाबत पत्र दिले आहे. पाठपुरावा करतो आहे. श्रीमती वाघुले यांचे वार्डातील १५ लोकांना शौचालयासाठी पात्र न करता, त्यांनी स्वत:हून बांधलेले आहे. त्या बाबतीत वार्ड अधिकारी यांचेशी चर्चा करून तपासणी करण्याचे सांगितले. त्यास पात्र ठरवून पैसे देता येईल. असे आदेशीत केले.

मा.आयुक्त :शौचालयाचा निधी आणणेसाठी शासनाकडे पाठपुरावा केला जाईल. स्वच्छ भारत मिशन यावर मी काम केले आहे. मा.पंतप्रधान यांनी स्वच्छ भारत बाबत जी संकल्पना आहे त्यांचे म्हणणे असे की, ही योजना जनआंदोलन म्हणून राबवायची आहे. एक कलेक्टीव्ह विषय आहे. एक वस्ती आहे व तेथील १० लोक उघड्यावर जात असेल तर पुर्ण वस्तीतल्या लोकांना त्याचा धोका उद्‌भवतो. हा सार्वजनिक विषय होतो. शासन शौचालयासाठी अनुदान देत आहे. टॉयलेट बांधत आहोत. काही ठिकाणी बांधून दिल्यानंतरही वापर होत

नाही. त्यासाठी लोकांनी स्वत:हून पुढाकार घेतला पाहिजे. या बाबतीत व्यवहार परीवर्तन असले पाहिजे की, आपण शौचालयास कुठे जायला पाहिजे? हा दृष्टीकोन निगराणी समिती व त्या-त्या लोकसेवेच्या मार्फत नेता म्हणून पुढे आला तर चांगलेच आहे.

मा.महापौर :लेखाविभागाने मा.आयुक्तांची मान्यता घेऊन यासाठी निधी देणे बाबत कार्यवाही करावी. हा विषय मंजूर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक स्वमअ-२०१५/ प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९.११.२०१५ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीच्या आढाव्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ४६०:-** **(मुख्यलेखापरीक्षक)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या आस्थापना-१ व २ या विभागाच्या कामकाजाचा मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिका औरंगाबाद यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालावर चर्चा करणेस्तव सर्वसाधारण सभेच्या अवलोकनार्थ सादर.

मा.महापौर :मुख्य लेखा परीक्षक यांना सुचना करतो की, यात आणखी आकृतीबंध आहे प्रमोशन आहे भरती प्रक्रिया आहे. त्या बाबतही कार्यवाही होणे अपेक्षीत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :या विषयावर अभ्यास केला नाही. पुढील सभेत घ्यावे.

मा.महापौर :हा विषय पुढील सभेत पहिल्या क्रमांकवर येईल. आकृतीबंध मंजूर केला, त्या बाबत खुलासा करावा.

श्री.राजगौरव वानखेडे :२०४ कर्मचारी दैनिक वेतनावर त्यांचे पदनाम व नावासहीत प्रस्ताव शासनाला पाठवावा. इतर मनपामध्ये अस्थायी कर्मचारी यांचे प्रस्ताव शासनाने मंजूर करून त्यांना सेवेत घेतले आहे. त्याप्रमाणे येथीलही कर्मचारी घेता येईल. तशी कार्यवाही मनपाने करावी.

श्री.भगवान घडमोडे :अस्थायी कर्मचारी यांचा पदनामासहीत प्रस्ताव मंजूर केला. परंतु आकृतीबंध पाठवत नाही. म्हणून तोही प्रस्ताव पाठविला नाही. शासनाने वेळोवेळी निर्देश दिले की, प्रस्ताव पाठवावा.

श्री.विकास जैन :देवळाई-सातारा कर्मचारी येथील उल्लेख यात नाही. इलिगल भरती झाली.

श्री.राजू शिंदे :सातारा-देवळाई येथील कर्मचारी घेतले ती इलिगल भरती झाली. त्या भरतीचा यात कुठेही उल्लेख नाही. आयुक्तांची दिशाभुल करून ती भरती केली होती. चौकशी करणार होते काय झाले? आकृतीबंध मध्ये वर्ग-३ व वर्ग २ चे अधिकारी प्रमोशनला कसे जातील याप्रमाणे बनविला आहे. वर्ग-४ कर्मचाऱ्याच्या बाबतीत त्याचे पाल्याना कुटूबींयाना अनुकंपा, प्रमोशन किंवा इतर फायदे मिळतील. असे काहीही दिले नव्हते किती लोकसंख्ये मागे किती लेबर लागतात. त्याचा विचार करून संख्या नमूद करावी व आकृतीबंध शासनाकडे तातडीने पाठवून पदांना मंजूरी घ्यावी.

श्री.भगवान घडमोडे :आकृतीबंध पाठवित नाही, भरती करणार नाही. आऊट सोर्सींगच्या नावाखाली लोक भरती केले त्याचेवर जबाबदारी देता येत नाही. आकृतीबंद का पाठवित नाही? माहिती घ्यावी.

श्री.अफसर खान :सातारा-देवळाई येथील कर्मचारी कायम सेवेत घेतले. ऑडीट मध्ये का आले नाही?

श्री.राजू शिंदे :सभागृहात एक कर्मचारी बसलेले आहे. त्यांचे आदेश कुणी काढले. त्यांचा पगार कोण देणार आहे. किती दिवसापासून ते काम करतात?

मा.आयुक्त :वर्ग-१ ची सहा पदे व वर्ग -२ ची १५ पदे रिक्त आहे. ऑडीट रिपोर्ट नुसार सन-२०१२ पासून आकृतीबंध विषयाची कार्यवाही प्रलंबीत आहे. पदे रिक्त असल्यामूळे आऊटसोर्सींगवर कर्मचारी घेतले. परंतु शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयात असे कर्मचारी असणे ही चांगली बाब नाही. महापालिकेचे बळकटीकरण करून घेणेसाठी आकृतीबंध मंजूर करून घेतला पाहिजे. किती अधिकारी कुठल्या वर्गातील असावे? त्याप्रमाणे आकृतीबंध तयार केला की नाही. ते तपासणी करून पुढील कार्यवाही करता येईल.

श्री.राजू शिंदे :आवश्यकतेनुसार कर्मचारी घेतले जातील. या ओळींचा आधार घेऊन १००० कर्मचारी आऊट सोर्सींगवर घेतले. पाच कोटी पगार देतो. ती एजन्सी ब्लॅकलिस्ट आहे. त्या एजन्सीने कर्मचारी कडून र.रु.५० हजार १ लक्ष रक्कम घेऊन त्यांना नोकरीवर घेतले पगार वेळेवर देत नाही. सभागृहातच आऊटसोर्सींगवर घेतलेले एक कर्मचारी बसलेले आहे. त्यांना ५ महिन्यापासून पगार नाही.

कामगार अधिकारी :सभागृहात स्टेनो कर्मचारी आहे. त्यांचे पदास तत्कालीन आयुक्त श्री.नवल किशोर राम यांनी मंजूरी दिली आहे. त्यानुसार एजन्सीला पत्र दिले. त्यांनी ते कर्मचारी दिले. सचिव विभागाकडून त्या पदाचे कर्मचारी द्यावेत अशी मागणी होती.

मा.महापौर :हा विषय पुढील सभेत सविस्तर माहितीसह ठेवण्यात येईल. या प्रस्तावा बरोबरच आकृतीबंध तसेच प्रमोशन व भरती प्रक्रियेसंबंधीची माहितीही सादर करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तुत प्रस्ताव पुढील सभेत सविस्तर माहितीसह ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्रमांक ४६१:-</u>** **(आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१३२९ दिनांक १६.१०.२०१७ अन्वये विभागीय चौकशीच्या प्रक्रियेतून दोषमुक्त करण्यात आलेले आहे.

संबंधितांचा निलंबन काळ दिनांक २१.०४.२०११ ते दिनांक ०८.११.२०१२ आणि बडतर्फीचा काळ दिनांक ०९.११.२०१२ ते दिनांक ०७.०१.२०१६ एकूण कालावधी ०४ वर्षे ०८ महिने व १९ दिवस असा असून सदर कालावधीबाबत निर्णय व्हायचा आहे. संबंधितांना विभागीय चौकशीच्या प्रक्रियेतून दोषमुक्त केले असल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन, तडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे पोटनियम ७०(१)(अ) व (ब) मधील तरतुदीनुसार संबंधीतांचा निलंबन व बडतर्फीचा

कालावधी नियमित करून सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून गृहीत धरून या कालावधीतील सर्व वेतन व भत्ते देय आहेत.

तथापी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार महानगरपालिकेचा जो अधिकार सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे.

करीता, श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांचा वरील निलंबन व बडतर्फी कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य काळ ग्राह्य धरून उक्त कालावधीतील सर्व वेतन व भत्ते अदा करणेसाठी मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना विभागीय चौकशीच्या प्रक्रियेतून दोषमुक्त केले असल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन, तडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम १९८१ चे पोटनियम ७०(१)(अ) व (ब) मधील तरतुदीनुसार श्रीमती अपर्णा थेटे यांचा निलंबन व बडतर्फीचा कालावधी नियमित करून सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य कालावधी म्हणून गृहीत धरून या कालावधीतील सर्व वेतन व भत्ते देय असल्याने त्यांचा उक्त निलंबन व बडतर्फीचा कालावधी सर्व प्रयोजनार्थ कर्तव्य काळ ग्राह्य धरून उक्त कालावधीतील सर्व वेतन व भत्ते श्रीमती अपर्णा कृष्णकुमार थेटे, विधी सल्लागार यांना अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ४६२:-</u>** **(उपआयुक्त, प्रशासन)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन-१९९६ मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी औरंगाबाद महानगरपालिका अग्निशमन विभागाकडे खालील तीन वाहने चिकलठाणा अग्निशमन केंद्र चालविण्यासाठी दिली आहे.

१. फोम टेंडर :- वाहन क्र.एम.एच.०४ एच ८०२७
२. वॉटर टेंडर :- वाहन क्र.एम.एच.०४ एच ८०१६
३. रुग्णवाहिका-१ :- वाहन क्र.एम.एच.०४ एच ७४
लॅडर १०.०५ मी. :-१ नग.
साहित्य संच :-१ नग.

सद्यस्थितीत सदरील वाहने जुनी झाल्यामुळे आर.टी.ओ. ॲक्टनुसार इंन्शुरन्स व फिटनेस प्रमाणपत्र सदर कार्यालयाकडून मिळत नसल्याने पर्यायी वाहने उपलब्ध करून देण्याबाबत मऔविम पत्रव्यवहार करण्यात आलेला होता. मुख्य अग्निशमन अधिकारी तथा अग्निशमन सल्लागार, मऔविम, मुंबई यांनी जुन्या वाहनांच्या बदल्यात नवीन वाहने उपलब्ध करून देता येणार नसुन जुनी वाहने मऔविम, अग्निशमन केंद्र, शेंद्रा, औरंगाबाद येथे पाठविण्यास कळविण्यात आलेले आहे.

तथापि, चिकलठाणा औद्योगिक महामंडळाच्या क्षेत्रात आणि सभोवतालच्या नागरी वसाहतींमध्ये महानगरपालिकेच्या वतीने अग्निशमन सेवा पुरविण्यात येते. परंतु महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र व नुतनीकरण प्रमाणपत्र मऔविम कार्यालयाकडून देण्यात येत आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या महसुली उत्पन्नात तुट निर्माण होत आहे. पर्यायाने मऔविमच्या कार्यक्षेत्रातून महानगरपालिकेस अग्निशमन सेवेच्या बदल्यात कोणतेही उत्पन्न मिळत नाही.

करीता, प्रस्ताव औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील मऔविमच्या कार्यक्षेत्रातील अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास पुर्वीप्रमाणे देण्यात यावे आणि पुर्वीपासून कार्यरत असलेल्या वाहनांच्या बदल्यात पर्यायी वाहने उपलब्ध करून देण्याच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार मनपास नाही. एमआयडीसी त्यांना एनओसी देते. आपले उत्पन्नही बुडते. एनओसीचे पैसे वगैरे मिळत नाही. फायर ऑडीट पण आपल्याकडे होत नाही.

श्री.राजू शिंदे :त्यांना मनपाकडे एनओसी घेण्याचे असल्यास एक टेबलचे काम वाढेल. एकतर तेथे मनपा सुविधा देत नाही. आता एमआयडीसी रस्ते करून घेणार आहे. एनओसी देणेसाठी २ महिने लागले. महापालिकेच्या एनओसीची गरज नाही. एमआयडीसी मधील प्लॉट जेव्हा एमआयडीसी हस्तातंरीत करते तेंव्हा महापालिकेचा पुर्ण टॅक्स दिल्याशिवाय हस्तांतरीत करू नये. असा ठराव घ्या यातून उत्पन्न वाढू शकते.

मा.महापौर :वाहने आउट डेटेड झाली. उत्पन्न वाढले पाहिजे योग्यच आहे. हा विषय मंजूर

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका हद्दीतील मऔविमच्या कार्यक्षेत्रातील अग्निशमन ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागास पुर्वीप्रमाणे देण्यास आणि पुर्वीपासून कार्यरत असलेल्या वाहनांच्या बदल्यात पर्यायी वाहने उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक ४६३:- (आस्थापना अधिकारी-१)

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.संजय कचरु पवार, लेखाधिकारी हे प्रभारी मुख्यलेखाधिकारी म्हणून कार्यरत असतांना लेखा विभागाचे कामकाज द्विनोंद लेखा पध्दतीने करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करताना दिनांक २३ सप्टेंबर २०१३ च्या शासन निर्णयानुसार ई-निविदा प्रणाली अंतर्गत करावयाच्या कार्यप्रणालीचा अवलंब करून १५ दिवस मुदतीची ई-निविदा प्रसिध्द करणे आवश्यक होते. परंतू तसे न करता शासन निर्णयातील तरतुर्दींचे उल्लंघन करणे, के.डी.एम.सी.(मायनेट) च्या संगणक प्रणालीत द्विनोंद लेखा पध्दतीची तरतुद असताना सदर प्रणाली महापालिकेमध्ये उपलब्ध असल्याबाबत सादरीकरणात उल्लेख न केल्याने वरिष्ठांची दिशाभूल केली व महापालिकेत उपलब्ध असलेल्या संगणक प्रणालीची वापर न केल्याने रु.२३.६० लक्ष अनावश्यक खर्च झाल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होणे, हरी लबडे अँड असोसिएटस् यांना एक वर्षासाठी कार्यादेश असताना सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ साठी मुदतवाढीचा प्रस्ताव सादर केला. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ प्रमाणे अशी संविधा करणेस मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक असताना कायद्याचे उल्लंघन करून सादरीकरण केले व वाढीव मुदत देतानाही सदर प्रणाली के.डी.एम.सी.च्या संगणक प्रणालीत उपलब्ध आहे, या बाबीकडे हेतूत: दुर्लक्ष करून वरिष्ठांपासून सदर बाब लपवून ठेवली. त्यामुळे सक्षम मान्यता नसतांना मुदतवाढ देणे, सन २०१३-१४ मध्ये संबंधीत एजन्सीला सॉफ्टवेअर इन्स्टॉलेशनचे काम करावयाचे होते. त्यानंतर डेटा फिडींगनुसार रिपोर्ट निर्गमित करणेचे काम असताना मुळ निविदा दरात कपात करणे आवश्यक होते. या बाबीकडे दुर्लक्ष करून मूदतवाढीस शिफारस करणे, आयुक्तांनी विचारणा केलेल्या स्थायी समितीची मान्यता घेतली होती का? या बाबीकडे जणिवपूर्वक दुर्लक्ष करून देयक अदाईबाबत शिफारस करणे इत्यादी

अनियमितता आढळून आल्या आहेत. संबंधीतांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ चे नियम ३ चा भंग केल्याने त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी दोषरोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रु.९३००-३४८०० ग्रेड पे रु.४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रु.९३००-३४८०० ग्रेड पे ४,६००/- अशी आहे.

करीता, श्री.संजय कचरू पवार, लेखाधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सूरू करणेच्या प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

श्री.राजू शिंदे :नामंजूर करावा.

मा.महापौर :सभागृहात झालेली चर्चा, बहुतांशी सन्माननीय सदस्यांनी केलेली सदरील प्रस्ताव रद्द करण्याची सुचना व चर्चेत केलेली मागणी यानुसार सन्माननीय सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा मान ठेवून सदरील प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो.

ठराव:-

प्रस्तुत प्रस्ताव नामंजुर करण्यात आला.

**विषय क्रमांक ४६४:-** **(आस्थापना अधिकारी-१)**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी निलंबित असतांना मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र.८९/२०१६ मध्ये आयुक्तांची कोणतीही परवानगी किंवा मान्यता न घेता परस्पर मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले. महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक सोयी-सुविधांच्या विकास कामांसाठी प्राप्त शासकीय अनुदान रु.२४.३३ कोटी पाच रस्त्यांच्या कामांच्या निविदा प्रक्रियेत झालेल्या अनियमिततेसंबंधी सदर जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. सदर प्रकरणी आयुक्त, महानगरपालिका यांच्या मान्यतेने कार्यकारी अभियंता यांनी दिनांक १९.०१.२०१६ रोजी मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले होते. कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२०१५/२७५ दिनांक ०५.१२.२०१५ मधील अ.क्र.८ नूसार जनहितवादी (पीआयएल) याचिकांमध्ये शपथपत्र सादर करत असताना त्यास मा.आयुक्तांची मान्यता घेण्यात यावी, असे नमूद असताना संबंधितांनी दिनांक १९.११.२०१६ रोजी मा.आयुक्तांची कोणतीही परवानगी किंवा मान्यता न घेता परस्पर मा.उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले.

संबंधितास दिनांक ०८/०९/२०१६ रोजीच्या आदेशान्वये निलंबित केलेले होते. त्यावेळी त्यांनी कार्यालयीन कर्तव्य प्राप्त नसताना शहर अभियंता पदाचे शपथपत्र दाखल केले. त्यांचेमार्फत शपथपत्र दाखल करणाऱ्या विधिज्ञास महानगरपालिकेच्या विधी विभागाकडून प्राधिकृत करण्यात आलेले नव्हते. तसेच सदर याचिकेत ते नावानिशी प्रतिवादी नाहित. त्यामुळे जोपर्यंत ते स्वत:हून प्रतिवादी होत नाही अथवा त्यांना नावानिशी प्रतिवादी करण्यात येत नाही तोपर्यंत त्यांना सदरचे शपथपत्र शहर अभियंता पदाच्या कर्तव्याशी निगडीत असल्याने दाखल करता येत नाही. यावरुन त्यांनी निलंबित असताना व आयुक्तांची परवानगी न घेता सदरचे शपथपत्र दाखल करून कार्यालयीन शिस्तीचा भंग केला आहे.

सदर प्रकरणांत दिनांक १९/०१/२०१६ रोजी महानगरपालिका प्रशासनाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेले शपथपत्र हे आयुक्तांचे निर्देशनानुसार अंतिम करण्यात आले असून त्यातील परिच्छेद क्र.१५ मध्ये दिनांक २३/०९/२०१३ च्या शासन निर्णयाप्रमाणे तसेच महाराष्ट्र म्युनिसिपल अकाउंट कोड (MMAC) च्या तरतुदीनुसार निविदा प्रकिया अंतिम करण्यात आली नाही, असे नमूद आहे. तसेच मा.विभागीय आयुक्त,मा.जिल्हाधिकारी व आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांचे अहवाल निविदा प्रक्रिया सदोष होती असा आहे. परंतू त्यांनी दाखल केलेल्या शपथपत्रामध्ये त्यांना दिलेल्या कारणे दाखवा नोटीसचे उत्तर व कार्यालयीन कृतीचे समर्थन केले आहे. यावरून आयुक्तांतर्फे दाखल शपथपत्र चुकीचे आहे, असा अर्थ निघतो. तसेच आयुक्तांनी अंतिम केलेले शपथपत्र अधिनस्त अधिकाऱ्याने त्यांच्या मान्यतेने दाखल करण्यात आले नाही असे म्हणणे हे कार्यालयीन शिस्तीचा भंग करणारे आहे, अशा स्वरूपाचे दोषारोप ठेवण्यात आले असून संबंधिताविरूध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी १३/०४/२०१७ रोजी दोषारोपपत्र बजाविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) आणि ५६(५) (स्पष्टीकरण) प्रमाणे महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त (वेतनश्रेणी पे बँड रू ९३००-३४८०० ग्रेड पे रू ४,४००/-) या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाचा पदावर आहे अशा अधिकाऱ्याची नियुक्ती प्राधिकारी व शिस्तभंगविषयक प्राधिकारी मा.सर्वसाधारण सभा आहे. संबंधितांची वेतनश्रेणी रू.१५६००-३९१०० ग्रेड पे ७,६००/- अशी आहे.

करीता श्री.एस.डी.पानझडे, शहर अभियंता यांचेविरूध्द विभागीय चौकशी सुरू करणेच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

श्री.राजगौरव वानखेडे :या विषयावर चर्चा करायची आहे.

(या वेळी काही सदस्य हा विषय नामंजूर करावा. असे एकाच वेळी सांगतात.)

मा.महापौर :सभागृहात झालेली चर्चा, बहुतांशी सन्माननीय सदस्यांनी केलेली सदरील प्रस्ताव रद्द करण्याची सुचना व चर्चेत केलेली मागणी यानुसार सन्माननीय सभागृहाचा व सन्माननीय सदस्यांचा मान ठेवून सदरील प्रस्ताव नामंजुर करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव नामंजुर करण्यात आला.

**विषय क्रमांक ४६५:-** **(कार्यकारी अभियंता, जलनि:सारण प्रकल्प)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-१० सिडको, टी.व्ही.सेंटर येथे व्यापारी संकूल बांधून स्टेडीयम विकसीत करणे किंमत रु.३,७७,४४,०००/- चे काम हाती घेण्यात आले असून, सद्यस्थितीत सदरचे काम प्रगतीपथावर असून पूर्णत्वाकडे आहे या कामाची सुधारीत प्रकल्प किंमत रु.४,९४,५५,१८१/- एवढी आहे. पूर्व मान्यतेनुसार या कामासाठी आर्कीटेक्ट श्री.महेश कुलकर्णी यांची पूर्वीच्या एकूण प्रकल्प किंमतीच्या १.५०% दराने नेमणूक करण्यात आलेली होती. या प्रकल्पावर त्यांची नेमणूक ते सन २०१३ पासून पालिकेच्या पॅनलवर असल्याने मा.आयुक्त यांच्या मंजुरीने करण्यात आलेली आहे. त्यानुसार करारनामा करून कार्यादेश देण्यात आला आहे. सदरचे दर मनपा पॅनल वरील आर्किटेक्ट/इंजिनिअर यांचे ठरविलेल्या दरानूसार योग्य आहेत.

सदर आर्किटेक्ट/इंजिनिअर (PMC) यांचे या नेमणुकीत मा.स्थायी समितीची मंजुरी घेण्याचे अनावधानाने राहून गेले होते. सदर आर्किटेक्ट/इंजिनिअर कामाचा कार्यादेश झाल्यापासून म्हणजेच सन २०१३-१४ पासून या प्रकल्पावर काम करीत आहेत. तरी वर नमूद प्रमाणे या कामासाठी आर्किटेक्ट

श्री.महेश कुलकर्णी यांची एकूण सुधारीत प्रकल्प किंमत रु.४,९४,५५,१८१/- च्या १.५% दराने काम करून घेण्याचा कार्योत्तर मंजुरीचा प्रस्ताव अवलोकनार्थ व मंजुरीस्तव सादर.

कार्य.अभियंता-बीओटी :टीव्ही सेन्टर येथे एका ग्राऊंडवर शॉपींग व स्टेडीयमचे प्रोजेक्ट हाती घेतले. त्यासाठी तत्कालीन मा.आयुक्त,श्री.कांबळे यांनी तेथील प्लॅनींग करणेसाठी श्री.महेश कुलकर्णी यांनी नेमणुक केली होती. त्यांनी चांगले प्लॅनींग केले. तेथे र.रु.१२ कोटी उत्पन्न व र.रु.४ कोटी खर्च झाले. आर्किटेक्टची नेमणूक रेग्यूलर करायची आहे. कार्योत्तर मान्यता घेत आहेत.

मा.महापौर :मंजुर रक्कम व वाढीव रक्कम याचा फरक किती? व त्यांना किती रक्कम द्यावी लागणार आहे?

कार्य.अभियंता-बीओटी :प्रोजेक्ट कॉस्टच्या दीड टक्के म्हणजे र.रु.६ लक्ष पर्यत रक्कम द्यावी लागणार आहे.

मा.महापौर :फक्त सहा लक्ष रक्कम द्यावी लागणार आहे. विषय मंजूर करण्यात येते.

